प.ग्रं.सं. ठाणे
षय : काव्य
सं.क्र. : ९२२९



REFBK-0007842
REFBK-0007842

णीं

— कै. बहिणाबाई

# बहिणाअीचीं गाणीं

कै. बहिणाबाअी चौधरी

क्रमांक ९२

REFBK-0007842

0842

प्रस्तावना

आचार्य प्र. के. अत्रे

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य अडीच रुपये

: प्रकाशक :
ग. पां. परचुरे
'ग. पां. परचुरे
प्रकाशन मन्दिर'
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

: सर्वाधिकार :
सौ. लीलादेवी चौधरी
नाशीक, यांचे स्वाधीन

आवृत्ति १ ली
डिसेंबर १९५२

: मुखपृष्ठ सजावट :
रघुवीर मुळगांवकर

: छाया चित्रकार :
श्री. धनसिंग दालवाला
जळगांव

: मुद्रक :
कृ. ना. सापळे
रामकृष्ण प्रिं. प्रेस,
त्रिभुवन रोड, मुंबई ४

# परिमळ

एकाद्या शेतांत मोहरांचा हंडा अचानक सांपडावा तसा बहिणाईच्या काव्यांचा शोध गेल्या दिवाळींत महाराष्ट्राला लागला. शास्त्राप्रमाणें वाङ्मयांत शोध क्वचितच लागतात. सोळा वर्षांपूर्वी मराठी साहित्यांत असाच एक मौल्यवान् शोध लागला. लक्ष्मीबाई टिळकांचीं 'स्मृतिचित्रें' प्रसिद्ध झालीं तेव्हां. लक्ष्मीबाईसारखाच बहिणाईचा जिव्हाळा जबर आहे. त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रतिभा नुसती झिरपते आहे. असें सरस आणि सोज्वळ काव्य मराठी भाषेंत फार थोडें आहे. आणि मौज ही आहे कीं, जुन्यांत चमकेल आणि नव्यांत झळकेल असें त्याचें तेज आहे. एका निरक्षर आणि अशिक्षित शेतकरी स्त्रीनें हें सारें रचलेलें आहे हा तर तोंडांत बोट घालायला लावील असा चमत्कार आहे. सुप्रसिद्ध मराठी कवि सोपानदेव चौधरी ह्यांच्या ह्या मातोश्री. गेल्याच वर्षी वयाच्या बाहात्तराव्या वर्षी त्या मरण पावल्या. सोपानदेवांची आणि माझी वीस बावीस वर्षांची मैत्री आहे. पण त्यांच्या माजघरांत सोन्याची एवढी खाण दडलेली असेल ह्याची मला माहिती नव्हती. त्यांना स्वतःला त्याची जाणीव असेल. पण ते पडले मुलखाचे लाजाळू. त्यांना वाटलें कीं, खानदेशी वऱ्हाडी भाषेमधल्या आपल्या अडाणी आईच्या ओव्यांचें 'सुशिक्षित आणि सुसंस्कृत' महाराष्ट्र कौतुक करील कीं नाहीं कोणास ठाऊक! म्हणून ते इतकीं वर्षें तोंडांत मूग धरून बसले. मागल्या दिवाळीच्या आधीं एक दिवस ते असेच माझ्याकडे आले. आणि एक चतकोर चोपडी हळूच उघडून त्यांत उतरलेली आपल्या आईची एक कविता भीत भीत त्यांनीं मला वाचून दाखविली.

येहरींत दोन मोटा
दोन्हीमधीं पानी एक
मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक !

त्याबरोबर ती वही मी त्यांच्या हातांतून खसकन् ओढून घेतली. आणि आधाशासारख्या साऱ्या कविता भरभर चाळल्या. भाषेची मला कुठेंच अडचण वाटली नाहीं. मी ओरडून सोपानदेवांना म्हणालों, "अहो, हें बावनकशी सोनें आहे! हें महाराष्ट्रापासून लपवून ठेवणें हा गुन्हा आहे." त्याच क्षणीं हें काव्य प्रसिद्ध करावयाचें आम्ही ठरविलें.

प्रतिभा हें कवीला निसर्गाचें देणें आहे. तें त्याच्याबरोबरच यावें लागतें. यत्नाचा किंवा विद्येचा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं. हें माझें आतां ठाम मत झालें आहे. कोकिळेनें तोंड उघडलें कीं आपोआप संगीत वाहूं लागतें. प्राजक्ताची कळी उमलली कीं ती सुगंधाचेच निश्वास टाकूं लागते. तसें जातीच्या कवीचें आहे. त्याचें हृदयच ताल धरून बसलेलें असतें. त्यामुळें त्याच्या जिभेवर शब्द जो येतो तो मुळीं नाचतच येतो. सृष्टींतलें सौंदर्य तेवढें त्याच्या डोळ्याला दिसतें. आणि जीवनांतलें संगीत त्याला ऐकूं येतें. डोंगराच्या कपारीआडून जसा एकादा झरा उचंबळत असतो, तसें काव्य एकसारखें त्याच्या हृदयांतून उसळ्या घेत असतें. असें मानल्याखेरीज जगांतील अमर काव्य कसें जन्माला येतें हें कोडें सुटणार नाहीं. बहिणाई ह्यांनीं तर शाळेचें कधीं तोंड पाहिलें नाहीं. त्यांना लिहितां येत नव्हतें नि वाचतांही येत नव्हतें. 'विठोबाचें अन् रामाचें मंदिर ह्याच माझ्या शाळा' असें त्या म्हणत. रोजचें घरांतलें अन् शेतांमधलें काम करतां करतां त्यांनीं गाणीं

रचलीं आणि त्यांतली थोडीशीं कुणीतरी टिपून ठेवलीं. पुष्कळशीं त्यांच्याबरोबरच गेलीं. अशी ही एक अपढिक आणि कष्टाळू गृहिणी जात्यावर दळतां दळतां किंवा चूल फुंकतां फुंकतां 'माय भीमाई माउली, जशी आंब्याची साऊली' किंवा 'माझ्या माहेराची वाट, माले वाटे मखमल' असलें जिवंत काव्य श्वास टाकावा इतक्या सहजपणें कशी करूं शकते ? कुणी म्हणेल आपल्या बायकांच्या जुन्या गाण्यांत असलें काव्य वाटेल तितकें आढळून येतें. पण तसें नाहीं. बहिणाईच्या प्रतिभेची जात फार निराळी आहे. धरित्रीच्या कुशींत झोंपलेलें बींबियाणें कसें प्रकट होतें ह्याचें त्यांनीं केलेलें वर्णन वाचा.

ऊन वाऱ्याशी खेयता
एका एका कोंबांतून
पर्गटलें दोन पानं
जसे हात जोडीसन
टाया वाजविती पानं
दंग देवाच्या भजनीं

असली कल्पनेची भरारी कोणत्या जुन्या स्त्रीगीतांत आढळून येईल ? मोटेचें पाणी थारोळयांत पडलेलें पाहून

वसांडली मोट
करे धो धो थायन्यांत
हुंदडत पानी
जसं तान्हं पाळण्यांत !

हें मनोहर चित्र जिची प्रतिभा पाहूं शकतें, किंवा ऐन तारुण्यांत सौभाग्य गमावलें असतांना

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खालीं
पुसोनिया गेलं कुंकू
रेखा उघडी पडली

असें वैधव्याचें हृदयभेदक करुणकाव्य जिच्या मुखांतून प्रकट होतें तिचें कवित्व सामान्य आहे असें कोण म्हणेल? सकाळीं उठून बहिणाई घरोटावर म्हणजे जात्यावर बसून दळूं लागल्या कीं जात्यांतून तिकडे पीठ पडूं लागायचें अन् इकडे ह्यांच्या ओंठांतून काव्य सांडू लागायचें :

अरे घरोटा घरोटा
तुझ्यांतून पडे पिठी
तसं तसं माझं गानं
पोटांतून येतं व्होटीं !

हें त्यांचें वर्णनच मुळीं त्यांनीं करून स्वतः ठेवलें आहे. स्वयंपाक-घरांत जाऊन त्या चूल पेटवायला बसल्या अन् चूल पेटतां पेटेनाशी झाली आणि तिच्यांतून नुसताच धूर बाहेर पडूं लागला म्हणजे त्या काव्यामधेंच संतापून त्या ‘ चुल्ह्या ’ ला म्हणत,

पेट पेट धुक्कयेला
किती घेसी माझा जीव
आरे इस्तवाच्या धन्या
कसं आलं तुले हींव !

पुढें चूल पेटली, तवा तापला आणि भाकरी टाकतांना हाताला चटके बसूं लागले म्हणजे संसाराचीं रहस्यें काव्यरूपानें त्यांच्या मुखावाटे प्रकट होत :

१२५५४
३।३।५७

बरा संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधीं हाताला चटके
तेव्हां मिळते भाकर

'तानक्या सोपांना'ला हाऱ्यांत निजवून आणि तो हारा डोक्यावर घेऊन बहिणाई शेताला निघाल्या कीं काव्य आपलें निघालेंच त्यांच्या बरोबर. वाटेंत तांबड्या फळांनीं लकडलेलें हिरवें वडाचें झाड दिसलें कीं लागले तें त्यांच्या ओंठांवर नाचायला :

हिरवीं हिरवीं पानं
लाल फळं जशी चोंच
आलं वडाच्या झाडाला
जसं पीक पोपटाचं !

रस्त्याच्या कडेला कडूलिंबाच्या झाडावरच्या पिवळ्या निंबोळ्या पाहिल्या कीं घेतलीच त्यानें त्याच्यावर झेंप :

कडू बोलतां बोलतां
पुढें कशी नरमली
कडू निंबोणी शेवटीं
पिकीसनी गोड झाली !

समोरून पंढरीच्या दिंडींतला एकादा भाविक वारकरी दिसला कीं गहिंवरून केलाच त्यानें त्याला प्रश्न :

अरे, वारकऱ्या तूले
नहीं ऊन वारा थंडी
झुगारित अवघ्याले
आली पंढरीची दिंडी

शेतामध्यें कांपणी चालो, मळणी चालो किंवा उपणनी चालो, काव्यानें बहिणाईची पाठ कधीं सोडली नाहीं. खळ्यांत बैलाची पात सुरू झाली आणि मेढ्याभोंवतीं बैल गरा गरा फिरूं लागला कीं लागलेच तें त्या बैलाला गोंजारायला :

पाय उचल रे बैला,
  कर बापा आतां घाई
चालू दे रे रगडनं
  तुझ्या पायाची पुन्याई

उपणनीच्या वेळीं वाऱ्यानें यावयाला जरा उशीर केला कीं त्यानें मारलीच त्याला हांकः

चाल ये रे ये रे वाऱ्या
  ये रे मारोतीच्या बापा
नको देऊं रे गुंगारा
  पुऱ्या झाल्या तुझ्या थापा !

शेतकऱ्याचें जीवन म्हणजे कष्टाचें. शेतकऱ्याचीं हाडें अखेर शेतांतच मोडावयाचीं अन् त्याची राख तापीमाईतच पडावयाचीं ह्याची बहिणाईना जाणीव होती. पण जीवनाबद्दल कृतज्ञता बाळगून शेतकऱ्यानें पंढरीच्या विठ्ठलावर भरिभार ठेवावा असें त्यांचें सांगणें होतें.

शेतामधीं गये घाम
  हाडं मोडीसनी
आतां घ्या रे हरीनाम
  टाया पिटीसनी

आळ
१२२१

तथापि, शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणामुळं विठ्ठलाची भक्ति करणें सुद्धां त्याला किती कठिण होतें ह्याचा अनुभव त्यांना नव्हता असें नाहीं.

अरे पांडुरंगा, तुझी
    कशी भक्ती करूं सांग
तुझ्या रूपापुढें येतं
    आड सावकाराचं सोंग.

शेतकऱ्याच्या मनाचें ह्यापेक्षां अधिक हृदयद्रावक चित्र कुणा कवीनें रेखाटलें असेल असें मला वाटत नाहीं. अशा रीतीनें महाराष्ट्रांतील भोळ्या, भाविक, कष्टाळू आणि समाधानी शेतकऱ्याच्या संसाराचें करुण काव्य बाळबोध आणि जिवंत जिव्हाळ्यानें बहिणाईच्या ह्या गाण्यांतून प्रकट झालेलें आढळून येईल.

मात्र, बहिणाईच्या काव्याचें एवढेंच वैशिष्ट्य नाहीं. मानवी जीवनाकडे बघण्याचें एक स्पष्ट आणि प्रभावी तत्त्वज्ञान त्यांच्याजवळ होतें. एकाद्या बुद्धिमान् तत्त्वज्ञान्याची किंवा महाकवीची जणुं कांहीं प्रतिभाच त्यांना प्राप्त झालेली होती. म्हणून त्यांच्या काव्याचा सर्व आविष्कार सुभाषितांचा आहे. आणि त्याचा आत्मा उपरोधी विनोदाचा आहे. मराठी वाङ्मयांत अमर होतील अशीं अनेक सुभाषितें जागोजाग त्यांच्या काव्यांत विखुरलेलीं आढळतील. 'कशाला काय म्हणूं नाहीं ?' या काव्यांत अशा सुभाषितांचें जणुं कांहीं एक शेतच पिकलेलें आहे. 'ज्यांतून कापूस येत नाहीं त्याला बोंड म्हणूं नये अन् ज्यांतून हरिनाम निघत नाहीं त्याला तोंड म्हणूं नये. भुकेल्या पोटीं जी माणसाला निजविते तिला रात म्हणूं नये, अन् दानासाठीं जो आंखडला जातो त्याला हात म्हणूं नये. इमानाला जो विसरला त्याला नेक म्हणूं नये अन् जन्मदात्याला जो भोंवतो

त्याला लेक म्हणूं नये. जिच्यामध्यें भाव नाहीं तिला भक्ति म्हणूं नये अन् जिच्यामध्यें चेव नाहीं तिला शक्ति म्हणूं नये.' ह्या बहिणाईंच्या उद्गारांत भाषेची आणि विचारांची केवढी देदीप्यमान श्रीमंती प्रकटलेली आहे! महाकवि झाला तरी तो ह्यापेक्षां अधिक काय आणखी बोलूं शकतो? समर्थांनीं 'मना' वर श्लोकांचा एवढा डोंगर रचून ठेवला आहे पण—

मन पाखरूं पाखरूं
त्याची काय सांगू मात?
आतां व्हतं भुईवर
गेलं गेलं आभाळांत?

किंवा—

मन जहरी जहरी
याचं न्यारं रे तंतर
अरे इंचू साप बरा
त्याला उतारे मंतर!

हा भाषेचा अन् विचारांचा हृदयंगम मासला 'मनाच्या श्लोकां' त कुठें आढळून येईल काय? आणि मनाच्या रचनेसंबंधीं शेवटीं बहिणाईंनीं देवाला प्रश्न केला आहे कीं,

देवा, असं कसं मन
असं कसं रे घडलं
कुठें जागेपणीं तुला
असं सपन पडलं!

तो तर आधुनिक पंडितांना स्तिमित करून टाकील असा आहे. जग हें मिथ्या आहे आणि संसार म्हणजे माया आहे ह्या विर-

क्तीच्या तत्त्वज्ञानानें महाराष्ट्रांतल्या गोरगरिबांचे फार नुकसान झालें आहे. त्यांना ह्या अडाणी शेतकरी कवयित्रीनें ‘संसार’ ह्या लहानशा कवितेंत फारच सुंदर अन् सामर्थ्यवान् संदेश दिला आहे. ‘संसाराला कधीं खोटा म्हणूं नये. देवळाच्या कळसाला का कुणी लोटा म्हणते ? संसार म्हणजे कांहीं नुसतें रडणें अन् कुढणें नाहीं. गळ्यांतल्या हाराला कुणी का लोढणें म्हणते ? संसार ही खिरी कांकडीसारखी आहे. वर तोंडाला ती कडू असते पण बाकीची सारी गोडच लागते.’

> कधीं नगद उधार
> सुखादुःखाचा बेपार
> अरे, संसार संसार
> असा मोठा जादूगार !

महाराष्ट्रांतल्या कोणत्या संतानें किंवा कवीनें संसाराचें रहस्य अशा रसाळ शब्दामधें सांगितलें आहे ? मानवी जीवनाचें रहस्य शुद्ध प्रेम आहे. स्वार्थ नाहीं. जीवन हें ‘हृदयाचें देणें घेणें’ आहे. हा बहिणाईचा दुसरा तेजस्वी संदेश आहे.

> नको लागूं जीवा, सदा मतलबापाठीं
> हिरिताचं देनं घेनं, नही पोटासाठीं

ऊन आणि वारा खात पिकें शेतांत उभीं असतात. कशासाठीं ! भुकेल्यांच्या पोटांत आम्हांला लौकर जाऊं दे रे असा मनामधें तीं देवाचा धांवा करीत असतात. माणसांचे खोटेनाटे व्यवहार बघून तर बोरीबाभळींच्या अंगावर कांटे आले तरी देखील माणसांवर उपकार करण्यासाठीं त्याच्या शेताभोवतीं आपल्या शरीराचीं त्यां कुंपणें करतात ! पोट कितीही भरलें तरी तें शेवटीं

रिकामेंच होणार ! अन् शरीर तर एक दिवसच निघूनच जाणार ! मागें जें कांहीं शिल्लक रहाणार तें फक्त हृदयाचे देणेंघेणें. दुसरें कांहीं नाहीं. शुद्ध आणि निःस्वार्थी प्रेमाचें यापक्षां अधिक हृदयंगम स्तोत्र कोण लिहूं शकेल ? बहिणाईना सर्वांत कशाची जास्त चीड असेल तर ती माणसाच्या स्वार्थातून निर्माण झालेल्या त्याच्या कृतघ्नपणाची ! त्या माणसाला संतापून म्हणतात, ‘ माणसा, तुला नियत नाहीं रे. तुझ्यापेक्षां तें गोठ्यांतलें जनावर बरें, गाय न् म्हैस चारा खाऊन दूध तरी देतात. तुझें एकदां पोट भरलें कीं तूं उपकार साफ विसरून जातोस. कुत्रा आपलें शेपूट इमानीपणाच्या भावनेनें हालवतो. तर माणसा, तूं आपली मान मतलब साधण्यासाठीं हालवतोस. केवळ लोभामुळें तूं माणूस असूनही काणूस म्हणजे पशू झाला आहेस.’ एवढें सांगून झाल्यानंतर बहिणाईनीं माणसाला तळमळून विचारलें आहे:

मानसा, मानसा
कधी व्हशील मानूस !

मानवतेलाच जणुं कांहीं त्यांनीं हें व्याकुळ हृदयानें आवाहन केलें आहे ! स्वार्थाचा वणवा सर्व जगभर आज पसरलेला आहे. माणसें पशू होऊन एकमेकांशीं झगडत आहेत. मानवता आज रक्तबंबाळ झाली आहे. म्हणूनच ‘माणसा, माणसा, कधीं होशील माणूस ?’ हीच आर्त हांक मानवतेच्या कल्याणासाठीं तळमळणाऱ्या संतमहात्म्यांच्या कारुणिक अंतःकरणांतून उचंबळते आहे ! माणसानें माणूस कसें व्हायचें हीच प्रचंड समस्या मानवजातीपुढें आज उभी आहे. ह्या समस्येचा साक्षात्कार बहिणाईसारख्या खानदेशांतील एका अडाणी शेतकरी महिलेला व्हावा हा तिच्या प्रतिभासामर्थ्याचा केवढा पडताळा आहे ! माणसांच्या कल्याणाचा जे नुसता कांगावा

१२५९८
३९१३८५३

करतात ते पंडित कवि ' नराचा नारायण ' करण्याच्या वारेमाप वल्गना करीत असतात. पण माणसाच्या जन्माला येऊन तो अजून पुरता माणूसही झाला नाहीं, हे मानवतेच्या व्याधीचें अचूक निदान ह्या अपढिक कवयित्रीनें केलें आहे.

गडकरी आणि कोल्हटकर ह्यांच्यासारख्या प्रगल्भ विनोद-पंडितांना शोभेल असला कोटिबाज आणि उपरोधिक विनोद बहिणाईनीं आपल्या काव्यांत सहज केलेला आहे हा त्यांच्या प्रतिभेचा दुसरा चमत्कार आहे.

भाऊ ' घमा ' गाळी घाम
' गणा ' भगतगणांत

ही शब्दांची मौज जातां जातां त्या साधूं शकतात. तथापि, ज्यांतून पीठ ' येतें ' त्याला ' जातें ' का म्हणतात, जो जमिनींत ' उभा ' आहे त्याला ' आड ' का म्हणतात किंवा ज्या दिवशीं आपण गुढी ' उभारतो ' त्या दिवसाला ' पाडवा ' कां म्हणतात ही बहिणाईची विनोदी पृच्छा मार्मिक नाहीं असें कोण म्हणेल ? विचारांचा आणि वर्णनाचा विनोद करण्यांतही त्यांचा चांगलाच हातखंडा होता. चार ओळींच्या काव्यांत चौथ्या ओळींत विनोदाचा ' स्फोट ' साधावयाचा हें आधुनिक तंत्र सुद्धां त्यांना अवगत होतें.

' फाट आतां टराटर,
नाहीं दया तुफानाला '
हाले बाभळीचें पान
बोले केळीच्या पानाला

किंवा

उंच्या खुज्या जोडप्याची
कशी जमली रे जोड

उगे ताडाखालीं जसं
भुईरिंगणीचें झाड !

अथवा

भरली विहीर
मोट चाले भराभर
कशाला करतें
कणाचाक कुरकुर ?

हे बहिणाईच्या सुभाषितात्मक विनोदी उपरोधाचे कांहीं तेजस्वी नमुने होत. कांहीं आप्तांचीं आणि स्थानिक व्यक्तींचीं जीं शब्दचित्रें त्यांनीं रेखाटलेलीं आहेत तें तर वर्णनात्मक विनोदाचें बहारदार मासलेच होत. तोंडांत विडी आणि हातांत छडी घेऊन चालणाऱ्या मुनीर नांवाच्या चकण्या कमिटीच्या शिपायाचें वर्णन वाचून तर कुणालाही हसूंच येईल. 'छोटू भय्या'च्या पोटाचें वर्णनही तसेंच हास्यकारक आहे.

बहिणाईची चुलत सासू 'भिवराई' ही मोठी विनोदी होती. ती अनेकांच्या नकला करून लोकांना हंसवी. तिचें वर्णन करतां करतां बहिणाईनें विनोदाचा एक मोठा सिद्धांतच सांगून ठेवला आहे.

नांव ठेवी अवघ्याला
करी सर्वांची नक्कल
हांसवता हांसवता
शिकवते रे अक्कल !

माणसांना हांसवून शहाणे करावयाचें हाच विनोदाचा प्रधान हेतू आहे. त्याचा बोध समाजांतील कित्येक गंभीर विद्वानांना झालेला नाहीं. पण बहिणाईनें विनोदाचें हें सामर्थ्य ओळखलेलें

होतें. बहिणाईच्या विनोदांत नुसता उपरोध नाहीं. त्यांत सहानुभूतीचा आणि कारुण्याचा ओलावा ओथंबलेला आहे. त्या दृष्टीनें ' खोकली माय ' ही कविता वाचून पहाण्यासारखी आहे. जळगांवांत खोकल्याची मोठी साथ आली. लोक सारे हैराण झाले. इतक्यांत एक म्हातारी भिकारीण गांवांत आली. आणि ' कांहींतरी धर्म करा ' असें म्हणूं लागली. तेव्हां गांवांतला एक म्होरक्या चिडून म्हणाला, " गांवांतला सारा खोकला तुला देऊन टाकला जा ! " म्हातारीनें तें दान स्वीकारलें. ती म्हणाली, " माझ्या कर्मांत जें दान आहे तें मला घेतलेंच पाहिजे." अशा तऱ्हेनें साऱ्या गांवाचा खोकल्याचा वाटा म्हातारीनें पत्करला. तेव्हां गांवांतली खोकल्याची साथ नाहींशी झाली. पण ती म्हातारी मात्र पुढें एका गल्लींत चोवीस तास खोकत बसायची. लोक तिला ' खोकली माय ' म्हणावयाचें आणि कुणाला खोकला आला तर तो जावा म्हणून ते हात जोडून तिला पांया पडावयाचे. ह्या कवितेतला विनोद हृदयाला पीळ पाडणारा आहे. ' गोसाई ' आणि ' जयरामबुवा ' ह्यांच्या बाहिणाईनीं सांगितलेल्या आख्यायिकाहि हृदयस्पर्शी आहेत. दंतकथांवर आधारलेल्या अशा कविता मराठीमधें फारच थोड्या आहेत.

रचनेच्या आणि भाषेच्या दृष्टीनें बहिणाईचें काव्य अत्यंत आधुनिक आहे. प्रत्येक काव्यामधें एक संपूर्ण घटना किंवा विचार आहे. त्याचा प्रारंभ आणि अखेर परिणामाच्या दृष्टीनें नाट्यात्मक व्हावा ह्याबद्दल त्यांचा कटाक्ष आहे. शब्दांचा किंवा विचारांचा फार विस्तार न करतां थोडक्यामध्यें एकादी भावना जास्तीत जास्त प्रभावानें कशी व्यक्त करतां येईल ह्याकडे त्यांनीं विशेष लक्ष्य दिलेलें आहे. त्या दृष्टीनें मराठी भाषेवरचें त्यांचें प्रभुत्व केवळ अद्‌भुतच म्हटलें पाहिजे. रसाच्या आणि ध्वनीच्या दृष्टीनें

कुठेंही ओढाताण किंवा विरस न होईल अशा कौशल्यानें त्यांनीं सोपे सोपे आणि सुंदर सुंदर शब्द वापरले आहेत. त्यांच्या खानदेशी वऱ्हाडी भाषेनें तर त्यांच्या काव्यांची लज्जत अधिकच वाढविली आहे असें माझें मत आहे. 'अशी कशी वेडी ग माये' ह्यापेक्षां 'अशी कशी येळी व माये' किंवा 'पाणी 'लौकीचं' नितळ। त्याला अंमृताची गोडी' ह्यापेक्षां 'पानी 'लौकीचं' नित्तय। त्याले अम्रीताची गोडी' ह्या भाषेंत अधिक लाडकेपणा वाटतो. एकादें गोजिरवाणें बालक बोबड्या भाषेंत बोलतांना आपल्याला जसा आनंद होतो, तसें बहिणाईचें काव्य वाचतांना मनाला नि कानाला वाटतें. अहिराणी आणि खानदेशी–वऱ्हाडी ह्या जरी मराठीच्या बोली असल्या तरी अहिराणीपेक्षां खानदेशी–वऱ्हाडी ही शुद्ध मराठीला अधिक जवळची आहे. 'ळ' च्या ऐवजीं 'य', 'ण' च्या ऐवजीं 'न', जोडून, वाहून किंवा करून ह्यांच्या ऐवजीं जोडीसन, वाहीसन आणि करीसन, तुला मला ह्या ऐवजीं तुले मले ह्या खेरीज आणि शब्दांच्या खेडवळ रूपाखेरीज उभय भाषेंत विशेष फरक नाहीं. असो. ज्या काळांत केशवसुत, विनायक, तांबे, बी किंवा गोविंदाग्रज हे महाराष्ट्राचे प्रतिभाशाली कवि आपल्या काव्याचा बहार महाराष्ट्रावर उधळीत होते, त्याच काळामध्यें जळगांवांत रहाणाऱ्या एका शेतकऱ्याच्या झोपडींत एक अडाणी मराठी गृहिणी जात्यावर दळतां दळतां किंवा शेतामध्यें काम करितां करितां आपल्या खेडवळ भाषेंत 'संसाराचीं गाणीं' गात होतीं. या गाण्यामध्यें जातिवंत जिव्हाळ्याचें आणि अलौकिक प्रतिभेचें काव्य प्रगट होत होतें ह्याची वर्षांनुवर्षें कोणाला जाणीव नव्हती. तें काव्य इतक्या विलंबानें कां होईना आज प्रकाशित होत आहे, हें मराठी भाषेचें

केवढें भाग्य होय. अभिजात आधुनिक मराठी कवितेंत मागून येऊनही बहिणाई आघाडीवरलें मानाचें स्थान पटकावून बसणार ह्यांत काय शंका ? मराठी मनाला मोहिनी घालील आणि स्तिमित करून टाकील असा भाषेचा, विचाराचा आणि कल्पनेचा विलक्षण गोडवा त्यांच्या काव्यांत शिगोशीग ओथंबलेला आहे. आणि

मानसा, मानसा,
कधीं व्हशील मानूस !

ह्या मानवतेला त्यांनीं दिलेल्या अमर संदेशानें तर मराठी वाङ्मयांत त्यांचें स्थान अढळच करून ठेवलेलें आहे !

खंडाळा,
२ डिसेंबर १९५२ } **प्रल्हाद केशव अत्रे**

# माझी आई

'बहिणाईची गाणीं' हा माझ्या आईचा कविता-संग्रह प्रसिद्ध होत असलेला पाहून वीस वर्षांपूर्वीची एक आठवण मला होत आहे. १९३२ सालीं विद्यार्थिदशेंत लिहिलेल्या माझ्या कवितांचा 'काव्यकेतकी' नांवाचा एक संग्रह प्रसिद्ध झाला. त्या पुस्तकाच्या आरंभीं अर्पणपत्रिका म्हणून माझ्या आईचें छायाचित्र देऊन त्याखालीं कवितेची मी एक ओळ दिली होती, 'तुझेंच यश माउली, तुजसि आज मी अर्पितों!' 'तुझेंच यश' या शब्दांत फार मोठा अर्थ भरलेला आहे. तें यश म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून माझ्या आईच्या गोड ओव्यांपासून मला मिळालेली काव्यस्फूर्ति हें होय! मी मराठी शाळेंत असतांना (मला वाटतें चौथ्या इयत्तेंत असेन) जुनीं पुस्तकें चाळीत होतों. पुस्तकें चाळतां चाळतां दुसऱ्या इयत्तेचें पुस्तक माझ्या हातीं आलें. शाईचे डाग पडलेल्या माझ्या कांहीं विशिष्ट खुणा त्या पुस्तकांत मी हुडकित होतों. तोंच माझ्या आवडीचा एक धडा मला दिसला. त्याचा मथळा 'सावित्रीचें चातुर्य.' तो धडा मोठ्या ऐटींत मी जोरानें वाचूं लागलो. आई माझेजवळ येऊन लक्षपूर्वक ऐकत होती. मला वाटलें माझ्या अशिक्षित आईला त्यांतलें काय कळणार! त्यानंतर सकाळीं रामप्रहरांत आई दळायला उठली. जात्याच्या घरघरी बरोबर तिच्या ओंठांतून बाहेर पडणाऱ्या मंजुळ ओव्या माझ्या कानीं पडतांच मी तिच्या मांडीवर डोकें ठेवून पडलों. आई ओव्या गात होती :

**सायत्री सायत्री, सत्येवानाची सांवली**
**निंघे सत्यवान, त्याच्या मांघून धांवली**

ह्या दोनच ओळ आतां मला आठवतात. दुर्दैवानें सर्व ओव्या आज उपलब्ध नाहींत. दळण सरल्यावर मी आईला विचारलें, " या ओव्या तुला कुणीं शिकवल्या ? " त्यावर ती म्हणाली, " कालदी तुनं माले घडा वाची दाखवला त्याचज गानं माह्या मनानं मी म्हनत व्हती ! " ( काल तूं मला धडा वाचून दाखविला त्याचंच गाणं मी माझ्या मनानें गात होते ) तिचें हें उत्तर ऐकतांच मी थक्क झालों.

त्यानंतर तुरखेडे येथील माझे मावसबंधु आमचे घरीं शिकायला म्हणून राहिले होते. ते आईला नेहमीं ओव्या म्हणायला लावीत असत. उतरूनही घेत असत. मीही सांपडेल त्या कागदावर उतरून घेत असे. श्रावण महिन्यांत पावसाची झडी लागली म्हणजे शेतकऱ्यांना घरांतच दडून बसावें लागतें. त्या वेळीं करमणूक म्हणून आम्ही आईला ओव्या गायला सांगत असूं. 'आला पाऊस पाऊस' वगैरे ओव्या अशा वेळींच उतरून घेतल्या होत्या. आईच्या ओव्यांचें खरें कौतुक आम्हां दोघांनाच होतें. बाकीच्यांना गाणीं गात बसणें म्हणजे रिकामटेकडेपणा वाटे. ते त्याची अवहेलना करीत. या असल्या गोष्टीकडे आम्हीं लक्ष देत नसूं. १९२६ सालीं मी जळगांव सोडलें. नाशिक येथें शिक्षणासाठीं आलों. त्यानंतर १९३१ सालीं ग्वाल्हेर येथें शिक्षणासाठीं गेलों. त्या गडबडींत आईच्या ओव्या कुठें तरी गहाळ झाल्या. मी मूग गिळून बसलों होतों. तरी पण बऱ्याच स्फुट ओव्या आणि गाण्यांचीं कांहीं कडवीं माझे स्मरणांत होतीं. तेवढीं मी केव्हांतरी गुणगुणत असे. गतवर्षी माझी आई निवर्तल्यानंतर दहा दिवसांनीं सुतक फिटण्याच्या दिवशीं बळदांतील कांहीं सामान उपशीत असतांना, एक जुनी, गंजलेली अन् चेपलेली ट्रंक मला आढळली. त्यांत मला आईच्या ओव्यांची वही आणि कांहीं जुनें सामान आढळलें. त्याच सुमारास पू. दादा धर्माधिकारी

सं. ग्रं. ओ०५ १२२९

नाशिक येथें माझे घरीं आले होते. मी एक दोन गाणीं त्यांना वाचून दाखविलीं. त्यांना तीं मनापासून आवडलेलीं दिसलीं. मध्यंतरी कांहीं ओंव्या प्रबोधनकार ठाकरे यांना म्हणून दाखवल्या त्यांनींही त्यांचे मनापासून कौतुक केलें. त्यानंतर आठ नऊ महिन्यांनीं अमळनेरहून प्रा. मधुकर फाटक यांचें मला एक पत्र आलें. अमळनेर साहित्य संमेलनानिमित्त निघणाऱ्या प्रातिनिधिक कवींच्या ‘ तापीतीरावर ’ या कविता संग्रहासाठीं त्यांनीं कविता मागविली होती. माझी एक कविता व आईची एक कविता ( येहरींत दोन मोटा ) अशा दोन कविता मी त्यांना पाठविल्या. दोन्ही कविता– विशेषतः आईची कविता त्यांना फारच आवडल्याचें दिसून आलें.

त्याच सुमारास मी मुंबईला कांहीं कामासाठीं आलों होतों. नेहमीं-प्रमाणें आचार्य अत्रे यांना भेटायला गेलों. माझ्या जवळची वही काढून मी जरा संकोचानेंच एक गाणें ( कशाला काय म्हणूं नये ? ) त्यांना गाऊन दाखविलें. त्यांनीं माझ्या हातची वही खस्दिशीं ओढून घेतली. सर्व कविता त्यांनीं वाचून काढल्या. आणि मला ते म्हणाले, “ अहो, हें बावनकशी सोनें आहे. हा मोठा ठेवा आहे. आतांपर्यंत कां लपवून ठेवला ? ” मी काय उत्तर देणार ? “ लहानपणापासून लिहिलेल्या माझ्या स्वतःच्या कविता बारा वर्षांनीं १९३२ सालीं मी प्रसिद्ध केल्या. तुम्हींच पुण्याच्या पहिल्या कविसंमेलनांत मला ओढून आणलें व उभें केलें. त्याच दिवशीं मी महाराष्ट्राला परिचित झालों.” आचार्यांचे समोर खालीं मान घालून मी हे उद्गार काढले. त्याच दिवशीं मी नाशिक येथें परत जाणार होतों. परंतु आचार्यांनीं माझें घरीं फोन करून मला दोन दिवस थांबाविलें. ओंव्यांची वही ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिराच्या हवालीं केली. ती आज पुस्तकरूपानें रसिकांसमोर येत आहे.

माझ्या आईला काव्याचें देणें अंगचें होतें. कथाकीर्तनादि श्रवणानें तिला बहुश्रुतपणा लाभला होता. अनुमान अंदाज हे अनुभव आणि अनुभूति झाले होते. ओव्या स्फुरतांना शब्दांची किंवा यमकांची तिला कधींच वाण पडली नाहीं. यमकें, श्लेष तिच्यासमोर पट्टेवाल्याप्रमाणें उभे रहात असत; कल्पना, उपमा दासीप्रमाणें जवळ धांवत येत असत; तिचें निरीक्षण नि विनोद बुद्धि तल्लख होती. तिची ग्रहणशक्ति आणि स्मरणशक्ति वाखाणण्यासारखी होती. माझ्या आईच्या काव्यासंबंधीं आचार्य अत्रे यांनीं प्रस्तावनेंत स्वयंस्फूर्तीनें सर्व कांहीं लिहिलें आहे. अगदीं शीग ओंसडून माप दिलें आहे. काव्याचा व्यवहार व व्यवहारांतील काव्य त्यांनीं डोळ्यांसमोर उभें करून जीवनसंगीताबरोबरच जीवनसंगतीही मोठ्या कौशल्यानें दाखविली आहे. इतकें हृद्य निवेदन तेच करूं जाणत ! त्याबद्दल मी जास्त लिहीत नाहीं. व्यवहारांतील तिचें साधें गद्य बोलणेंही किती मार्मिक व काव्यपूर्ण असे याबद्दल थोडेसें मी लिहीत आहें.

आमच्या मळ्यांत विहिरीमागें एक आंब्याचें झाड आहे. विहिरीच्या धांवेवर एक गुलमोहराचें झाड होतें. एकदां कुणीतरी तिला म्हणालें, "गुलमोहराच्या झाडाचा काय उपयोग ? या झाडाला फळें नाहींत. ना पोट भरे ना ओठ भरे !" त्यावर आई म्हणाली, "आंब्यानें पोट भरत असेल. त्याच्या झाडाची सावली मिळत असेल. पण या गुलमोहराच्या झाडानें डोळ्यांनां सुख मिळतं आणि मन भरतं."

कापूस वेंचणीच्या वेळीं मी एकदां आईबरोबर शेतांत गेलों होतों. कापसाचें एक बोंड हातीं घेतलें व त्याचा कापूस ( रूई ) बाजूला काढून सरकी हातावर घेतली. त्यावर आई म्हणाली,

" पहा, देवानं सरकीला कसा पांढरा स्वच्छ पोषाख नेसवून पाठविलं. पण माणसानें तिला नागडी केली आणि तिचें वस्त्र तो आपण स्वतःच नेसूं लागला."

मी एकदां आईला म्हणालों, " तूं शेतांत कष्टाचीं कामें करतेस. तुझी नजर जमिनीकडे आणि तुला हे सर्व विचार सुचतात तरी कसे ?" त्यावर आईनें उत्तर दिलें, " धरत्रीच्या आरशामधीं मी सरग ( स्वर्ग ) पाहते बापा ! "

आधुनिकतेकडे तिचा कल होता. जुन्याबरोबर नव्याचेंही ती स्वागत करीत असे. एक अत्यंत खुजी म्हातारी ( धुडाबोय ) आमचे वाड्यांत असे. पोरें चिडवीत असतां त्यांच्यामागें ती पळाली म्हणजे " अरे, आगगाडीचं मोहाळं (इंजन) आलं रे ! " अशी यंत्रयुगांतील उपमा ती देत असे. नवकवींनीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

दर उन्हाळ्यांत आई नाशिक येथें हवापालट म्हणून येत असे. जळगांव येथील शेतकरी स्त्रियांत ती जितकी विलीन होत असे तितकीच ती पांढरपेशांतही तल्लीन होत असे. खेडूत जीवन जगणाऱ्या व नागरी जीवन जगणाऱ्या स्त्रियांचे या निमित्तानें तिनें बरेंच निरीक्षण केलेलें होते. एकदा सौ. लीलादेवीनें तिला सहज विचारलें, " सासूबाई, तुम्ही खानदेशांत वालाचे बिरडें, केळफुलाची भाजी कां करीत नाहीं ?" त्यावर ती म्हणाली, " सूनबाई, शेतकरी बाया शेतीच्या कामानेंच इतक्या बेजार होतात कीं त्यांना वेळ मिळत नाहीं. वेळ असता तर चिंचेच्या पानांच्या पत्रावळी करून त्यावरही त्या जेवल्या असत्या ! " तिचें म्हणणें माझ्या पत्नीला पूर्णपणें पटलें. त्याचबरोबर मनापासून हंसूही आलें. आई आजारी असल्याचें पत्र आलें म्हणजे मी ताबडतोब

जळगांवला जात असे, तेथें गेलो म्हणजे एका दिवसांतच तिला आराम वाटायचा ! मी एकदां म्हणालो "आई, मी तुला भेटायला आलो कीं तुझा आजार लगेच कसा नाहिंसा होतो ?" त्यावर ती म्हणाली "तूं औषधासारखा येतोस !" गेल्या वर्षीच्या तिच्या दुखण्यांत मात्र माझा औषधासारखा उपयोग झाला नाहीं. शेवटचे क्षण ती मोजींत होती. ३ डिसेंबर १९५१ रोजीं माझी आई इहलोक सोडून गेली. सहज बोलण्यांतील तिचे अनेक प्रसंग मला सांगतां येतील. त्यांतील थोडी वानगी रसिकांसमोर ठेवली. यापेक्षां जास्त लिहीत नाहीं.

'शामची आई' चित्रपटाचें चित्रीकरण चालू असतांना वेळांत वेळ काढून आचार्य अत्रे यांनीं माझ्या आईचीही कदर केली. तिचें यथार्थ काव्यदर्शन म्हणून सुंदर प्रस्तावना लिहून दिली याबद्दल आचार्यांचे कसे आभार मानूं ? त्यांच्या ऋणांतच गुंतून रहावेसें वाटतें. पुस्तकाच्या शेवटीं शब्दार्थ दिले आहेत. त्यापैकीं कांहीं शब्दांचे अर्थ व अर्थवाही खुलासे जळगांव येथील माझे पुतणे श्री. पितांबर चौधरी यांनीं वेळेवर पाठविले त्यांचे आभार मानणेंही परकेपणाचें होईल. ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिरानें मोठ्या आवडीनें पुस्तक प्रकाशित केले याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानतो.

९ डिसेंबर १९५२ मुंबई. —सोपानदेव चौधरी,

# बहिणाईचीं गाणीं

## आदिमाया

आशी कशी येळी व माये, अशी कशी येळी ?
बारा गाडे काजळ कुंकू
पुरलं नहीं लेंनं
साती समदूराचं पानी
झालं नही न्हानं
आशी कशी येळी व माये, आशी कशी येळी ?
धरतीवरलं चांदी सोनं
डागीन्याची तूट
आभायाचं चोयी लुगडं
तेभी झालं थिटं
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?
इडा पिडा संकटाले
देल्हा तूनें टाया
झाल्या तुझ्या गयामंधीं
नरोंडाच्या माया
आशी कशी येळी व माये, आशी कशी येळी ?
बरह्मा इस्नू रुद्र बाळ
खेळईले वटीं

कोम्हायता फुटे पान्हा
गानं आलं व्होटीं
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?

नशीबाचे नऊ गिऱ्हे
काय तुझ्या लेखीं ?
गिऱ्हानाले खाईसनी
कशी झाली सुखी ?
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?

नऊ ग्रहासी खाउन गेली
सहज एकया गोष्टी
दहाव्याशी खाईन तव्हां
कुठें राहिन सुष्टी
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी ?

★

# माहेर

बापाजीच्या हायलींत
येती शेट शेतकरी

दारीं खेटराची रास
घरीं भरली कचेरी

गांवामधी दबदबा
बाप महाजन माझा

त्याचा कांटेतोल न्याव
जसा गांवामधीं राजा

माय भीमाई माऊली
जशी आंब्याची साऊली

आम्हाईले केलं गार
सोता उन्हांत तावली

तुझे भाऊ देवा घरीं
नहीं मायबाप तुले

तुले कशाचं माहेर
लागे कुलूप दाराले

भाऊ 'घमा' गाये घाम
'गना' भगत गनांत

'धना' माझा लिखनार
गेला शिक्याले धुयांत

आम्ही बहीनी ' आह्यला '
' सीता, तुयसा, बहीना '
देल्या आशीलाचे घरीं
सगेसाई मोतीदाना

लागे पायाले चटके
रस्ता तापीसनी लाल
माझ्या माहेराची वाट
माले वाटे मखमल

जीव व्हतो लाही लाही
चैत्र वैसागाचं ऊन
पाय पडतां ' लौकींत '
शीन जातो निंघीसन

तापीवानी नही थडी
जरी वाहे थोडी थोडी
पानी 'लौकी'चं नित्तय
त्याले अम्रीताची गोडी

माहेरून ये निरोप
सांगे कानामंधीं वारा
माझ्या माहेराच्या खेपा
' लौकी ' नदीले विचारा !

★

# कशाला काय म्हनूं नहीं ?

बिना कपाशीनं उले
त्याले बोंड म्हनूं नहीं
हरी नामाईना बोले
त्याले तोंड म्हनूं नहीं
नही वाऱ्यानं हाललं
त्याले पान म्हनूं नहीं
नहीं ऐके हरीनाम
त्याले कान म्हनूं नहीं
पाटा येहेरीवांचून
त्याले मया म्हनूं नहीं
नहीं देवाचं दर्सन
त्याले डोया म्हनूं नहीं
निजवते भुक्या पोटीं
तिले रात म्हनूं नहीं
आंखडला दानासाठीं
त्याले हात म्हनूं नहीं
ज्याच्या मधीं नही पानी
त्याले हाय म्हनूं नहीं
धांवा ऐकून आडला
त्याले पाय म्हनूं नहीं
येहेरींतून ये रीती
तिले मोट म्हनूं नहीं

केली सोताची भरती
त्याले पोट म्हनूं नहीं
नहीं वळखला कान्हा
तीले गाय म्हनूं नहीं
जीले नहीं फुटे पान्हा
तिले माय म्हनूं नहीं
अरे, वाटच्या दोरीले
कधीं साप म्हनूं नहीं
इके पोटच्या पोरीले
त्याले बाप म्हनूं नहीं
दुधावर आली बुरी
तिले साय म्हनूं नहीं
जिची माया गेली सरी
तिले माय म्हनूं नहीं
इमानाले इसरला
त्याले नेक म्हनूं नहीं
जलमदात्याले भोंवला
त्याले लेक म्हनूं नहीं
त्याच्यामधीं नहीं भाव
त्याले भक्ती म्हनूं नहीं
त्याच्यामधीं नहीं चेव
त्याले शक्ती म्हनूं नहीं !

★

# संसार

अरा संसार संसार
जसा तावा चुल्हयावर
आंधी हाताले चटके
तव्हां मियते भाकर
करा संसार संसार
खोटा कधीं म्हनूं नहीं
राऊळाच्या कयसाले
लोटा कधीं म्हनूं नहीं
अरे, संसार संसार
नहीं रडनं कुढनं
येड्या, गयांतला हार
म्हनूं नको रे लोढनं
अरे, संसार संसार
खीरा येलावरचा तोड
एक तोंडा मधी कडू
बाकी अवघा लागे गोड
अरे, संसार संसार
म्हनूं नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूल
मधी गोंडब्याचा ठेवा
देखा संसार संसार
शेंग वरतून कांटे

अरे, वरतून कांटे
मधीं चिक्ने सागरगोटे
ऐका, संसार संसार
दोन्ही जीवाचा ईचार
देतो दुःखाले होकार
अन् सुखाले नकार
देखा संसार संसार
दोन्ही जीवाचा सुधार
कधीं नगद उधार
सुखादुखाचा बेपार
अरे, संसार संसार
असा मोठा जादूगार
माझ्या जीवाचा मंतर
त्याच्यावरती मदार
असा संसार संसार
आधीं देवाचा ईसार
माझ्या दैवाचा जोजार
मंग जीवाचा आधार !

★

# घरोट (जातें)

देवा, घरोट घरोट
तुझ्या मनांतली गोट
सर्व्या दुनियेचं पोट
घरीं कर्माचा मरोट
अरे, घरोट घरोट
वानी बाम्हनाच ' जातं,
कसा घरघर वाजे
त्याले म्हनवा घरोट
अरे, जोडतां तोडलं
त्याले नातं म्हनू नहीं
ज्याच्यांतून येतं पीठ
त्याले जातं म्हनूं नहीं
कसा घरोट घरोट
माझा वाजे घरघर
घरघरींतून माले
माले ऐकूं येतो सूर
त्यांत आहे घरघर
येड्या, आपल्या घराची
अरे, आहे घरघर
त्यांत भल्यां आभायाची

आतां घरोटा घरोटा
दयन मांडलं नीट
अरे, घंट्या भरामधीं
कर त्याचं आतां पीठ
चाल घरोटा घरोटा
तुझी चाले घरघर
तुझ्या घरघरींतून
पीठ गये भरभर
जशी तुझी रे घरोटा
पाऊ फिरे गरगर
तसं दुधावानी पीठ
पडतं रे भुईवर
अरे, घरोटा घरोटा
तुझ्या माकनीची आस
माझ्या एका हातीं खूटा
दुज्या हातीं देते घांस
अरे, घरोटा घरोटा
घांस माझा जवारीचा
तुले सनासुदी गहूं
कधीं देते बाजरीचा
माझा घरोट घरोट
दोन दाढा दोन व्होट
दाने खाये मूट मूट
त्याच्यातून गये पीठ

३।०५
१२२७

अरे, घरोटा घरोटा
माझे दुखतां रे हात
तसं संसाराचं गानं
माझं बसते मी गात

अरे, घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पीठी
तसं तसं माझं गानं
पोटातून येतं व्होटीं

दाने दयतां दयतां
जशी घामानं मी भिजे
तुझी घरोटा घरोटा
तशी पाऊ तुझी झिजे

झिजिसनी झिजीसनी
झाला संगमरवरी
बापा, तुले टाकलाये
टकारीन आली दारीं !

★

# मन

मन वढाय वढाय्
उभ्या पीकांतलं ढोर
किती हांकला हांकला
फिरी येतं पिकांवर

मन मोकाट मोकाट
त्याले ठायीं ठायीं वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
पान्यावऱ्हल्यारे लाटा

मन लहरी लहरी
त्याले हातीं धरे कोन ?
उंडारलं उंडारलं
जसं वारा वाहादन

मन जह्यरी जह्यरी
याचं न्यारं रे तंतर
आरे इचू, साप बरा
त्याले उतारे मंतर !

मन पांखरूं पांखरूं
त्याची काय सांगूं मात ?
आतां व्हतं भुईवर
गेलं गेलं आभायांत

मन चप्पय चप्पय
त्याले नहीं जरा धीर

तठे व्हयीसनी ईज
आलं आलं धर्तीवर

मन एवढं एवढं
जसा खाकसचा दाना

मन केवढं केवढं ?
त्यांत आभाया मायेना

देवा, कसं देलं मन
आसं नहीं दुनियांत !

आसा कसा रे यवगी
काय तुझी करामत !

देवा, आसं कसं मन ?
आसं कसं रे घडलं

कुठे जागेपनीं तूले
आसं सपन पडलं !

★

# हिरीताचं देनं घेनं

नको लागूं जीवा, सदा मतलबापाठीं
हिरीताचं देनं घेनं नही पोटासाठीं

उभे शेतामधी पिकं
ऊन वारा खात खात
तरसती 'कव्हां जाऊं
देवा, भुकेल्या पोटांत'

पेटवा रे चुल्हा आता, मांडा थाटवाटी
नको लागूं सदा जीवा, मतलबापाठीं

पाहीसनी रे लोकाचे
यवहार खोटे नाटे
तव्हां बोरी बाभयीच्या
आले आंगावर कांटे

राखोयीच्यासाठीं झाल्या शेताले कुपाटी
नको लागूं जीवा, आतां मतलबापाठी

किती भरला कनगा
भरल्यानं होतो रिता
हिरीताचं देनं घेनं
नहीं डाडोराकरतां

गेली देही निंघीसनी नांव रे शेवटीं
नको लागूं जीवा, सदा मतलबापाठीं

★

# लपे करमाची रेखा

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खालीं
पुशीसनी गेलं कुंकू
रेखा उघडी पडली
देवा, तुझ्याबी घरचा
झरा धनाचा आटला
धन रेखाच्या चऱ्यानं
तयहात रे फाटला
बापा, नको मारूं थापा
असो खऱ्या असो खोट्या
नहीं नशीब नशीब
तयहाताच्या रेघोट्या
अरे, नशीब नशीब
लागे चक्कर पायाले
नशिबाचे नऊ गिऱ्हे
ते भी फिरत राह्यले
राहो दोन लाल सुखी
हेच देवाले मांगन
त्यांत आलं रे नशीब
काय सांगे पंचागन
नको नको रे जोतिषा,
नको हात माझा पाहूं
माझं दैव माले कये
माझ्या दारी नको येऊं !

★

# वाटच्या वाटसरा

वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !
नशीबीं दगड गोटे
काट्याकुट्याचा धनी
पायाले लागे ठेंचा
आलं डोयाले पानी
वरून तापे ऊन
आंग झालं रे लाही
चालला आढवानी
फोड आले रे पायीं
जानच पडीन रे
तुले लोकाच्या साठीं
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !
दिवस ढयला रे
पाय उचल झट
असो नसो रे तठी
तुझ्या लाभाची गोट
उतार चढनीच्या
दोन्हि सुखादुखांत
रमव तुझा जीव
धीर धर मनांत
उघडूं नको आतां
तुझ्या झांकल्या मुठी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !

'माझेज भाऊबंद
धाईसनी येतीन !'

नको धरूं रे आशा
धर एव्हढं ध्यान

तुझ्या पायानं जानं
तुझा तुलेच जीव

लावनी पार आतां
तुझी तुलेच नाव

मतलबाचे धनी
सर्वी माया रे खोटी

वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !

वाऱ्याचं वाहादन
आलं आलं रे मोठं

त्याच्यांत झुकीसनी
चुकुं नको रे वाट

दोन्ही बाजूनं दऱ्या
धर झुडूप हातीं

सोडूं नको रे धीर
येवो संकट किती

येऊं दे परचीती
काय तुझ्या ललाटीं

वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी !

★

# शेतीचीं साधनें

सरत सरत
करे पेरत पेरत

मोघडा मोघडा
पेरनीचा चवघडा

पांभर पांभर
मांघे धारये झांबर

कोयप कोयप
निंदाईले सोप सोप

आऊत आऊत
आला कमाईले ऊत

तीफन तीफन
व्हये शेताचं मापन

चाहूर चाहूर
आतां सरलं काहूर

वखर वखर
घाले मायेची पाखर

नागर नागर
सर्व्या सुखाचं आगर

★

# आला पाऊस

आला पह्यला पाऊस
शिपडली भुई सारी
धरत्रीचा परमय
माझं मन गेलं भरी
आला पाऊस पाऊस
आतां सरीवर सरी
शेतं शिवारं भिजले
नदी नाले गेले भरी
आला पाऊस पाऊस
आतां धूमधडाख्यानं
घरं लागले गयाले
खारी गेली वाहीसन
आला पाऊस पाऊस
आला लल्‌करी ठोकत
पोरं निंघाले भिजत
दारीं चिल्लाया मारत
आला पाऊस पाऊस
गडगडाट करत
धडधड करे छाती
पोरं दडाले घरांत
आतां उगूं दे रे शेतं
आला पाऊस पाऊस

वऱ्हे येऊं दे रे रोपं
आतां फिटली हाऊस

येतां पाऊस पाऊस
पावसाची लागे झडी

आतां खा रे वडे भजे
घरांमधी बसा दडी

देवा, पाऊस पाऊस
तुझ्या डोयांतले आंस

दैवा, तुझा रे हारास
जीवा, तुझी रे मिरास

# पेरनी

पेरनी पेरनी
आले पावसाचे वारे
बोलला व्होलगा
पेर्ते व्हा रे पेर्ते व्हा रे
पेरनी पेरनी
आले आभायांत ढग
ढगांत बाजंदी
ईज करे झगमग
पेरनी पेरनी
आभायांत गडगड
बरस बरस
माझ्या उरीं धडधड
पेरनी पेरनी
काढा पांभरी मोघडा
झडीन तो झडो
कव्हा बर्सातो चौघडा
पेरनी पेरनी
आला धरतीचा वास
वाढे पेरनीची
शेतकऱ्या, तुझी आस
पेरनी पेरनी
आतां मिरूग बी सरे

बोलेना व्होलगा
        पेर्ते व्हारे पेर्ते व्हारे
पेरनी पेरनी
        भीज भीज धर्ती माते
बीय बियान्याचे
        भरून ठेवले पोते
पेरनी पेरनी
        अवघ्या जगाच्या कारनीं
ढोराची चारनी
        कोटी पोटाची भरनी
पेरनी पेरनी
        देवा, तुझी रे करनी
दैवाची हेरनी
        माझ्या जीवाची झुरनी

★

# देव अजब गारोडी

धरत्रीच्या कुशीमधीं
बीयबियानं निजलीं
वऱ्हे पसरली माटी
जशी शाल पांघरली
बीय टरारे भुईंत
सर्वे कोंब आले वऱ्हे
गह्यरलं शेत जसं
आंगावरतीं शहारे
ऊन वाऱ्याशीं खेयतां
एका एका कोंबांतून
पर्गटले दोन पानं
जसे हात जोडीसन
टाया वाजवती पानं
दंग देवाच्या भजनीं
जसे करती कारोन्या
होऊं दे रे आबादानी
दिसामासा व्हये वाढ
रोप झाली आतां मोठी
आला पिकाले बहार
झाली शेतामधी दाटी
कसे वाऱ्यानं डोलती
दाने आले गाडी गाडी
दैव गेलं रे उघडी
देव अजब गारोडी !

★

# कापनी ( कापणी )

आतां लागे मार्गेसर
आली कापनी कापनी
आज करे खालेवऱ्हे
डाव्या डोयाची पापनी
पड्ले जमीनीले तढे
आली कापनी कापनी
तशी माझ्या डोयापुढं
उभी दान्याची मापनी
शेत पिवये धम्मक
आली कापनी कापनी
आतां धरा रे हिंमत
इय्ये ठेवा पाजवुनी
पिकं पिवये पिवये
आली कापनी कापनी
हातामधी धरा इय्ये
खाले ठेवा रे गोफनी
काप काप माझ्या इय्या,
आली कापनी कापनी
थाप लागली पीकाची
आली डोयाले झांपनी

आली पुढं रगडनी
आतां कापनी कापनी
खये करा रे तय्यार
हातीं घीसन चोपनी
माझी कापनी कापनी
देवा तुझी रे मापनी
माझ्या दैवाची करनी
माझ्या जीवाची भरनी

★

# रगडनी (मळणी)

केला पीकाचा रे सांठा
    जपीसन सर्व्याआधीं
शेत शिवाराचं धन
    आतां आलं खयामधीं
खय झालं रे तैयार
    सम्दी भूई सारवली
मधी उभारलं मेढ
    पात बैलाची चालली
आतां चाल चाल बैला,
    पात चाले गरगर
तसे कनूसामधून
    दाने येती भरभर
आतां चाल चाल बैला,
    आतां चाल भिरभिरा
व्हऊं दे रे कनुसाचा
    तुझ्या खुराखाले चुरा
पाय उचल रे बैला,
    कर बापा आतां घाई
चालूं दे रे रगडनं
    तुझ्या पायाची पुन्याई !
पाय उचलरे बैला,
    कनूसाचा कर भूसा

दाने एका एकांतून
पडतील पसा पसा

आतां चाल चाल बैला,
पुढें आली उपननी

वारा चालला रे वाया,
कसा ठेवू मी धरूनी

पात सरली सरली
रगडनी सुरूं झाली

आतां करूं उपननी
झट तिव्हार मांडली

आतां सोडी देल्ही पात
बैलं गेले चाऱ्यावरी

डोयापुढें उपननी
जीव माझा वाऱ्यावरी

रगडनी रगडनी
देवा, तुझीरे घडनी

दैवा तुझी झगडनी
माझी डोये उघडनी !

★

# उपननी

उपननी उपननी
आतां घ्या रे पाव्या हातीं

राहा आतां उपन्याले
उभे तिव्हारीवरती

चाल ये रे ये रे वाऱ्या,
ये रे मारोतीच्या बापा

नको देऊं रे गुंगारा
पुऱ्या झाल्या तुझ्या थापा

नही अझून चाहूल
नको पाडूं रे घोरांत

आज निंघाली कोनाची
वाऱ्यावरती वरात ?

ये रे वाऱ्या घोंघावत
ये रे खयाकडे आधीं

आज कुठें रे शिरला
वासराच्या कानामधीं !

भिनभिन आला वारा
कोन कोनाशीं बोलली ?

मन माझं हारखलं
पानं झाडाची हाललीं !

वारा आलारे झन्नाट्या
झाडं झुडपं डोलली
धरा मद्नाच्या पाट्या
खाले पोखरी चालली
देवा, माझी उपननी
तुझ्या पायीं इनवनी
दैवा, तुझी सोपवनी
माझ्या जीवाची कारोनी

★

# मोट हाकलतो एक

येहेरींत दोन मोटा
दोन्हींमधीं पानी एक
आडोयाले कना, चाक
दोन्हींमधीं गती एक
दोन्ही नाडा-समदूर
दोन्हींमधीं झीज एक
दोन्ही बैलाचं ओढणं
दोन्हींमधीं ओढ एक
उतरनी-चढनीचे
नांव दोन धाव एक
मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक ?

★

# गाडी जोडी

माझ्या लाल् बैलायची जोडी रे
कशी गडगड चाले गाडी

एक रंगी एकज शिंगी रे
एकज चन्‌का त्यांचे अंगीं

जसे डौलदार ते खांदे रे
तसे सरीलाचे बांधे

माझ्या बैलाय्‌ची चालनी रे
जशी चप्पय हरनावानी

माझ्या बैलाय्‌ची ताकद रे
साखयदंडाले माहित

दमदार बैलाची जोडी रे
तिले साजे गुंढयगाडी

कशि गडगड चाले गाडी रे
माझी लाल् बैलायची जोडी

कसे टन् टन् करती चाकं रे
त्याले पोलादाचा आंख

सोभे वरती रंगित खादी रे
मधीं मसूऱ्यांची गादी

वऱ्हे रेसमाचे गोंडे रे
तिचे तीवसाचे दांडे

बैल हुर्पाटले दोन्ही रे
चाकं फिरती भिंगरीवानी

मोर लल्कारी धुर्करी ना—
लागे पुऱ्हानं ना आरी

अशी माझी गुंढयगाडी रे
तिले लाल् बैलायची जोडी

★

३/०५ १२२९

# गुढी उभारनी

गुढीपाडव्याचा सन
आतां उभारा रे गुढी

नव्या वरसाचं देनं
सोडा मनांतली आढी

गेलसालीं गेली आढी
आतां पाडवा पाडवा

तुम्ही येरांयेरांवरी
लोभ वाढवा वाढवा

अरे, उठा झाडा आंग
गुढीपाडव्याचा सन

आतां आंगन झाडूनी
गेली राधी महारीन

कसे पडले घोरत
असे निस्सयेलावानी

हां हां म्हनतां गेला रे
रामपहार निंघूनी

आतां पोथारा रे घर
सुधारा रे पडझडी

करीसन सारवन
दारीं उभारा रे गुढी

चैत्राच्या या उन्हामधीं
जीव व्हये कासाईस
रामनाम घ्या रे आतां
रामनवमीचा दीस

पडी जातो तो 'पाडवा'
करा माझी सुधारनी
आतां गुढीपाडव्याले
म्हना 'गुढी उभारनी'

काय लोकाचीबी तऱ्हा
कसे भांग घोटा पेल्हे
उभा जमीनीच्या मधीं
आड म्हनती उभ्याले

आस म्हनूं नहीं कधीं
जसं उभ्याले आडवा
गुढी उभारतो त्याले
कसं म्हनती पाडवा ?

★

# आखजी ( अक्षय्य तृतिया )

आखजीचा आखजीचा
मोलाचा सन देखा जी

निंबावरी निंबावरी
बांधला छान झोका जी

माझा झोका माझा झोका
चालला भिराभिरी जी

माझा झोका माझा झोका
खेयतो वाऱ्यावरी जी

गेला झोका गेला झोका
चालला माहेराले जी

आला झोका आला झोका
पलट सासराले जी

माझा झोका माझा झोका
जीवाची भूक सरे जी

भूक सरे भूक सरे
वाऱ्यानं पोट भरे जी

आला वारा आला वारा
वाऱ्यानं जीव झुले जी

जीव झुले जीव झुले
झाडाची डांग हाले जी

डांग हाले डांग हाले
नजर नहीं ठरे जी

झाली आता झाली आतां
धरती खालेवऱ्हे जी

आंगनांत आंगनांत
खेयती पोरीसोरी जी

झाल्या दंग झाल्या दंग
गाऊनी नानापरी जी

झाला सुरूं झाला सुरूं
पहिला माझा पिंगा जी

फुगड्यांचा फुगड्यांचा
चालला धांगडधिंगा जी

दारोदारीं दारोदारीं
खेयाची एक घाई जी

घरोघरीं घरोघरीं
मांडल्या गवराई जी

गवराई गवराई
सजव सजवल्या जी

संगातीनी संगातीनी
बोलव बोलवल्या जी

बोलवल्या बोलवल्या
टिपऱ्या झाल्या सुरुं जी

टिपऱ्याचे टिपऱ्याचे
नादवले घुंगरू जी
किती खेय किती खेय
सांगूं मी काय काय जी
खेयीसनी खेयीसनी
आंबले हातपाय जी
चार दीस चार दीस
इसावल्या घरांत जी
आहे पुढें आहे पुढें-
शेतीची मशागत जी
सन सरे आस उरे
आखजी गेली व्हयी जी
सांग सई सांग सई,
आखजी आतां कही जी ?

★

# पोया ( पोळा )

आला आला शेतकऱ्या
पोयाचा रे सन मोठा
हातीं घेईसन वाख्या
आतां शेंदूराले घोटा
आतां बांधा रे तोरनं
सजवा रे घरदार
करा आंघोयी बैलाच्या
लावा शिंगाले शेंदूर
लावा शेंदूर शिंगाले
शेंव्या घुंगराच्या लावा
गयामधीं बांधा जीला
घंट्या घुंगरू मिरवा
बांधा कवड्याचा गेठा
आंगावऱ्हे झूल छान
माथां रेसमाचे गोंडे
चारी पायांत पैंजन
उठा उठा बह्यनाई,
चुल्हे पेटवा पेटवा
आज बैलाले नीवद
पुरनाच्या पोया ठेवा

वढे नागर वखर
नहीं कष्टाले गनती
पीक शेतकऱ्या हातीं
याच्या जीवावर शेती

उभे कामाचे ढिगारे
बैल कामदार बंदा
याले कहीनाथे झूल
दानचाऱ्याचाज मिंधा

चुल्हा पेटवा पेटवा
उठा उठा आयाबाया
आज बैलाले खुराक
रांधा पुरनाच्या पोया

खाऊं द्या रे पोटभरी
होऊं द्या रे मगदूल
वशीसनी यायभरी
आज करूं द्या बागूल

आतां ऐका मनांतलं
माझं येळीचं सांगन
आज पोयाच्या सनाले
माझं येवढं मांगन

कसे बैल कुदाळता
आदाबादीची आवड

वझं शिंगाले बांधतां
बाशिंगाचं डोईजड

नका हेंडालूं बैलाले
माझं ऐका रे जरासं

व्हते आपली हाऊस
आन बैलाले तरास

आज पुंजा रे बैलाले
फेडा उपकाराचं देनं

बैला, खरा तुझा सन
शेतकऱ्या तुझं रीन !

★

# गोसाई

तठे बसला गोसाई
धुनी पेटयी शेतांत
करे 'बं बं भोलानाथ'
चिमटा घीसन हातांत

मोठा गोसाई यवगी
त्याच्या पाशीं रे इलम
राहे रानांत एकटा
बसे ओढत चिलम

अरे, गोसायाच्यापाशीं
जड्याबुट्या व्हत्या फार
देये लोकाले औसद
रोग पयी जाये पार

अशा औसदाच्यासाठीं
येती लोकाच्या झुंबडी
पन कोन्हाबी पासून
कधीं घेयेना कवडी

चार झाडाले बांधल्या
व्हत्या त्याच्या चार गाई
पेये गाईचज दूध
पोटामधीं दूज नहीं

एक व्हती रे ढवयी
एक व्हती रे कपीली
एक व्हती रे काबरी
आन एक व्हती लाली
सव्र्या गायींमधीं व्हती
गाय कपीली लाडकी
मोठ गुनी जनावर
देवगायीच्या सारकी
व्हती चरत बांदाले
खात गवत चालली
रोप कराचं दिसलं
त्याले खायासाठीं गेली
रोप वडाचं दिसलं
भूत बोले त्याच्यांतून
'नींघ वढाय कुठली !
व्हय चालती आठून'
आला राग कपीलाले
मालकाच्याकडे गेली
शिंग हालवत पाहे
माटी उखरूं लागली
तिचा मालक गोसाई
समदं कांहीं उमजला

'कोन आज कपीलाले
टोचीसनी रे बोलला?'
तसा गेला बांधावर
रोप हाललं हाललं

त्याच्यातून तेच भूत
जसं बोललं बोललं
टाके गोसाई मंतर
भूत पयीसनी गेलं
तसं वडाच्या रोपाचं
तठी जैऱ्ही रोप झालं
आरे जहरी बोल्याची
अशी लागे त्याले आंच
रोप वाढलं वाढलं
झाड झालं जहराचं
मोट्ठ झाड जहाराचं
गोसायाच्या शेतामधीं
ढोरढाकर त्याखाले
फिरकती ना रे कधीं
काय झाडाचं या नांव?
नहीं मालूम कोन्हाले
आरे कशाचं हे झाड
पुसा गोसाई बोवाले!

★

# जयराम बुवाचा मान

तुझ्या लाडक्या लेकाचा
देता मान तुले

जाऊं आतां सम्दे जनं
लोडगे खायाले

घ्यारे पुंजापत्री हातीं
उदबत्ती कापुर

व्हा हात जोडीसनी
जयराम् बोवावर

'आज आली तुझ्या दारीं
मांगन रे तुले

दे जयराम बोवा आतां
आऊक्ष लेकाले'

आतां सांगते मी ऐका
एका रे काहानी

काय अवगत घडली या
पुन्यात्री ठिकानीं

"बारा वरसाचा मुंजा
वाटसरू कोनी

टिस लागीसनी गेला
पेयालेज पानी

त्याले सोंबर दीसली
येहेर मयांत
तांब्या शिकाई घेतली
टाकली गयांत

मंग वडांग कुदीसनी
येहूरीजोय आला
तव्हां तितक्यांत कोनी
कोनी खकारला

जोय वडाच्या खालती
कोनी आवलिया
तढी व्हता देवध्यानीं
जयराम बोवा

म्हनें जयराम बोवा
'कोन तूं पोरगा
अरे, पानी पेयाआंधी
खाई घे लोडगा'

व्हता मुंजाबी भुकेला
बोवा पुढें आला
हातीं घेतला लोडगा
खायाले लागला

मंग खाऊन लोडगा
वाटली हुशारी

गेला पेयासाठीं पानी
आला येहूरीवरी

त्यानं सोडली शिकायी
नित्तय पान्यांत

घेये भरीसनी तांब्या
घटाघट पेत

तव्हां पानी पेतां पेतां
वडाच्या खालुन

गेला सर्पटत साप
मुंजाच्या बाजुनं

तसा पाहे जय्राम् बोवा
डोये रोखीसन

आतां लागीन लागीन
मुंज्याले रे पान

पेल होता मुंजा पानी
पेयांत मगन

तो कशाले देईन
आठे तठे ध्यान ?

तसा उठे जयराम् बोवा
तीराच्या सारखा

देला सापावर पाय—
सापावर देख।

साप चेंदता चेंदता
साप उलटला
आन् मुंजाच्या वाटचा
बोवाले डसला

तव्हां पयाला पयाला
मुंजा घाबरत
पडे जयराम बोवा
लह्यऱ्याज देत

गेली गेली रे वातनी
आवघ्या गांवाले
आला तठे 'हीराबाबू'
साप उतार्‍याले

गेला जय्रामबोवा मरी
उपेग काय रे
काय चालीन मंतर
सापाले उतारे ?

अरे, उल्टला मंतर
हीराबाबू वऱ्हे
गेलं चढीसनी ईख
सोताज लहरे

झडपला 'हीराबाबू'
गेला रे पयत

आन् मधींच पडला
सोंबरल्या शेतांत
मौत जयराम बोवाची
गेली नही हाटी
लोक आले रे पाह्याले
झाली तठी दाटी

देवमानूस शेवटे
देवाघरीं गेला
जिव धोक्यांत घातला
मुंजा वाचवला
देलं जयराम बोवानं
जीवाचं रे दान
आतां मुंजासाठीं लोक
देती त्याले मान

जारे ' बिद्याच्या ' वरते
' आसोद्याच्या ' वाटे
तठी वडाच्या खालते
जयराम बोवा भेटे "

★

# खोकली माय

हिवायाचं थंड वारं
बोरी पिकल्या रानांत

आली जयगावामधीं
आली खोकल्याची सात

रस्त्यांवर वावरांत
लोक खोकल्यांत येडे

घरोघरीं खोकलंनं
जसे वाजती चौघडे

अरे, घेतले औसदं
नही राहे कुठें बाकी

तरी जायेना खोकला
सर्वे वैद्य गेले थकी

सर्वे वैद्य गेले थकी
आतां जावा कुठें तरी?

करे मनांत इचार
कोनी गांवाचा कैवारी

अरे, गांवाचा कैवारी
होता मोठा हिकमती

मेहेरूनच्या रस्त्यानं
जात व्हता कुठे शेतीं

" कसा आला रे खोकला
म्हने आवंदाच्या सालीं "
गांवाच्याच शिववर
कोन्ही म्हतारी भेटली

तशी म्हतारी बोलली
" कांहीं धर्म वाढ बापा
इडापीडा या गांवाची
व्हई जाईन रे सपा "

तव्हां गांवचा कैवारी
काय बोले म्हतारील
" माझ्या गांवचा खोकला
सर्वा दान केला तुले. "

ऐकीसनी म्हतारी बी
तव्हां पडे भरमांत
म्हने ' घेनंच पडीन
दान आलं जें कर्मात ! '

मंग घेतला खोकला
सर्व गांव झाडीसनी
आन् बसे खोकलत
सदा गया खल्लीसनी

गेला गेला सर्वा निंघी
गांवामधला खोकला

असा खोकल्याचा वांटा
म्हतारीनं उचलला
खोक्ला निंघीजायासाठीं
धरती म्हतारीचे पाय

हात जोडती रे लोक
खोक्ली माय खोक्ली माय
मेहेरूनच्या वाटेनं
जरा वयव रे पाय

तुले दिशीन रस्त्याले
तठे आतां खोक्ली माय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५.८५२
ग्रंथ

# काय घडे आवगत

उचलला हारा
हारखलं मन भारी
निजला हाऱ्यांत
तान्हा माझा शिरीहारी
डोक्यावर हारा
वाट मयाची धरली
भंवयाचा मया
आंब्याखाले उतरली
उतारला हारा
हालकलं माझं मन
निजला हाऱ्यांत
माझा तानका 'सोपान'
लागली कामाले
उसामधी धेरे बारे
उसाच्या पानाचे
हातींपायीं लागे चरे
ऐकूं ये आरायी
धांवा धांवा घात झाला !
अरे, धांवा लव्हकरी
आंब्याखाले नाग आला

३७।३१५३

तठे धांवत धांवत
आली उभी धांववर
काय घडे आवगत
कायजांत चरचर

फना उभारत नाग
व्हता त्याच्यामधीं दंग
हारा उपडा पाडूनी
तान्हं खेये नागासंग

हात जोडते नागोबा
माझं वांचव रे तान्हं
अरे, नको देऊं डंख
तुले शंकराचा आन

आतां वाजव वाजव
बालकिस्ना तुझा पोवा
सांग सांग नागोबाले
माझा आयक रे धांवा

तेवढ्यांत नाल्याकडे
ढोरक्याचा पोवा वाजे
त्याच्या सूराच्या रोखानं
नाग गेला वजेवजे

तव्हां आली आंब्याखाले
उचललं तानक्याले

फुकीसनी दोन्हीं कान
मुके कितीक घेतले

देव माझा रे नागोबा
नहीं तान्ह्याले चावला

सोता व्हयीसनी तान्हा
माझ्या तान्ह्याशीं खेयला

कधीं भेटशीन तव्हां
व्हतील रे भेटी गांठी

येत्या नागपंचमीले
आणीन दुधाची वाटी

★

# आप्पा महाराज

नाम जपता जपता
‘ जे जे रामकृस्न हरी ’

आप्पा महाराज गेले
गेले आज देवाघरीं

जसा पुत्रू ‘ रामदास ’
आन सून ‘ सीतामाई ’

तसा लोकावरी जीव
मनीं दुजाभाव नहीं

उभ्या गांवाचे कैवारी
खरे रामाचे पुजारी

आप्पा महाराज गेले—
सोडीसनी देवाघरीं

आंसू लोकाचे गयाले
जशा पावसाच्या सरी

आप्पा महाराज गेले
गेले आज देवाघरीं

आप्पाजींची दयामाया
किती पार नहीं त्याले

तुम्ही इचारा इचारा
‘ बाबजीच्या समाधीले

तुकाराम, मुक्ता जना'
मरीसनी रे जगले

आतां कसं म्हनू तरी
आप्पा महाराज मेले ?

किती भजन कीर्तन
रामनामाची लहेर

केलं रामाचं मंदीर
संत लोकाचं माहेर

राम लक्ष्मन सीता
बसवले रे मंदीरीं

त्याले सोन्याचा कयस
जागा संगमरवरी

दरसाल दहा दिसा
येतो उच्छावाले भर

वाहनावऱ्हे बशीसनी
येती दहा अवतार

दाही सरता वहनं
आली एकादशी मोठी

मंग सवारला रथ
झाली गांवामंधी दाटी

चार फोडले नारय
अरे, चाऱ्ही चाकावरी

सर्व्या मयांतले फुलं
चढवले रथावरी
रस्त्यावर शीपडल्या
लाखो पान्याच्या घागरी
रथ चाले घडाघडा
लागे चाकाले मोगरी
सर्व्या बजाराचे केये
माझ्या रथाची वानगी
घरोघरीं ऐपतींत
मिये पैशाची कानगी
लोक आले दर्सनाले
लोक झुंड्यावर झुंड्या
रथापुढती चालल्या
किती भजनाच्या दिंड्या
ज्यांनीं केली कार्तीकीले
'जयगांवाची' पंढरी
आप्पा महाराज गेले
गेले म्हनूं कस तरी ?

★

# आली पंढरीची दिंडी

दारीं उभे भोये जीव
घरीं पयाले पाखंडी
टायमुर्दुंगाची धून
आली पंढरीची दिंडी
पुढें लाह्याची डालकी
बुक्कागुलालाची गिंडी
मधी चालली पालखी
आली पंढरीची दिंडी
दोन्ही बाजू वारकरी
मधीं 'आप्पा महाराज'
पंढरीची वारी करी-
आले 'जयगायीं, आज
अरे वारकऱ्या, तुले
नही ऊन, वारा, थंडी
झुगारत अवघ्याले
आली पंढरीची दिंडी
टायमुर्दुंगाच्यावरी
हरीनाम एक तोंडी
'जे जे रामकिस्न हारी'
आली पंढरीची दिंडी
शिक्यावर बालकुस्ना
तठी फुटली रे हांडी

दहीकाला खाईसनी
आली पंढरीची दिंडी
मोठ्या तट्टयाच्या दमन्या
त्यांत सर्वा सामायन
रेसमाच्या कापडांत
भागवत रामायन
आले 'आप्पा महाराज'
चाला दर्सन घेयाले
घ्या रे हातीं परसाद
लावा बुका कपायाले
करा एवढं तरी रे
दुजं काय रे संसारी
देखा घडीन तुम्हाले
आज पंढरीची वारी
कसे बसले घरांत
असे मोडीसन मांडी
चला उचला रे पाय
आली पंढरीची दिंडी

★

# विठ्ठल मंदिर

माझं इठ्ठल मंदीर
अवघ्याचं माहेर

माघ इठ्ठल रखूमाई
उभे इटेवर

टाय वाजे खनखन
मुरदुंगाची धुन

तठे चाललं भजन
गह्यरी गह्यरीसन

टायकऱ्याचा जमाव
दंगला दंगला

तुकारामाचा अभंग
रंगला रंगला

तुम्ही करा रे भजन
ऐका रे कीर्तन

नका होऊं रे राकेस
सुध्द ठेवा मन

आता सरला अभंग
चालली पावली

'जे जे इठ्ठल रखूमाई
ईठाई माऊली'

शेतामंधी गये घाम
हाडं मोडीसनी
आतां घ्या रे हरीनाम
टाया पीटीसनी

उभा भक्तीचा हा झेंडा
हरीच्या नांवानं
हा झेंडा फडकावला
'झेंडूला बोवानं'

आतां झाली परदक्षीना
भूईले वंदन
'हेचि दान देगा देवा'
आवरलं भजन

आतां फिरली आरती
भजन गेलं सरी
'बह्यना' देवाचीया दारीं
उभी क्षनभरी

★

# खरा देवा मधी देव

अरे कानोड कानोड
सदा रुसते फुगते
आंगावरती लेयाले
सर्वे डागीने मांगते
अरे डागिने मांगते
हिची हौस फिटेनाज
अशी कशी नितातेल
तिले गान गाती रोज
माय कानोड कानोड
मानसाची जमे थाप
देखा वाजयी वाजयी
सर्वे फुटले रे डफ
अरे पाह्य जरा पुढें
आली पंढरीची हुडी
पाहीसन झाली कशी
तुझी कानोड कानोडी !
माय कानोड कानोड
काय देवाचं रे सोंग !
खरा देवामधी देव
पंढरीचा पांडुरंग
अरे, एकनाथासाठीं
कसा चंदन घासतो

सांवत्याच्या बरोबर
खुर्पे हातांत धरतो
'बोधाल्याच्या, शेतामधी
दाने देतो खंडी खंडी

झाला इठोबा महार
भरे दामाजीची हुंडी
कबीराच्या साठीं कसा
शेले इने झटपट

जनाबाई बरोबर
देव चालये घरोट
कुठे तुझी रे कानोड
कुठे माझा रे इठोबा

कुठे निंबाची निंबोयी
कुठे 'बोरशाचा' आंबा
अरे इठोबा सारखं
देवदेवतं एकज

चला घ्या रे दरसन
निंघा पंढरीले आज !

★

# मानूस

मानूस मानूस
मतलबी रे मानसा,
तुले फार हाव
तुझी हाकाकेल आशा
मानसा मानसा,
तुझी नियत बेकार
तुझ्याहून बरं
गोठ्यांतलं जनावर
भरला डाडोर
भूलीसनी जातो सूद
खाईसनी चारा
गायम्हैस देते दूध
मतलबासाठीं
मान मानूस डोलये
इमानाच्यासाठीं
कुत्रा शेंपूट हालये
मानसा मानसा,
कधीं व्हशीन मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस !

★

# पिलोक ( प्लेग )

[library stamp]

पिलोक पिलोक
आल्या पिलोकाच्य गाठीं
उजाडलं गांव
खयामयांमधीं भेटी
पिलोक पिलोक
जीव आला मेटाकुटी
भाईर झोंपड्या
गांवामधीं मसन्‌वटी
पिलोक पिलोक
कशाच्या रे भेठीगांठी !
घरोघरीं दूख
काखाजांगामधीं गांठी
पिलोक पिलोक
आतां नशीबांत ताटी
उचलला रोगी
आन्‌ गांठली करंटी

★

# चुल्हा पेटता पेटेना !

घरीं दाटला धुक्कय
कसा हाटतां हाटेना
माझे डोये झाले लाल
चुल्हा पेटतां पेटेना
कसा पेटतां पेटना
चुल्हा किती फुका फुका
लागल्या रे घरामंधीं
अवघ्याले भुका भुका
आतां सांपडेना हातीं
कुठे फूकनी बी मेली
कुठे पट्टवकरीन—
'नूरी, पयीसन गेली.
आतां गेल्या सरीसनी
पेटीमंधल्या आक्काड्या
सर्व्या गेल्या बयीसनी
घरामधल्या संकाड्या
पेट पेट धुक्कयेला,
किती घेसी माझा जीव
आरे इस्तवाच्या धन्या !
कसं आलं तुले हींव !
तशी खांबाशी फूकनी
सांपडली सांपडली.

फुकी-फुकीसनी आग
पाखडली पाखडली !

आरे फूकनी फूकतां
इस्तो वाजे तडतड

तव्हां धगला धगला
चुल्हा कसा धडधड

मंग टाकला उसासा
थोडा घेतला इसावा

एकदांचा आदयला
झट चुल्ह्यावर तावा

आतां रांधते भाकर
चुल्ह्यावर ताजी ताजी

मांधे शिजे वजेवजे
भांगचुल्हीवर भाजी

खूप रांधल्या भाकरी
दुल्ळी गेली भरीसनी

मंग हात धोईसनी
इस्त्यावर पडे पानी

इस्त्यावर पडे पानी
आली वाफ हात लासे

तव्हां उचलता तावा
कसा खदखदा हांसे !

★

# स्फुट ओंव्या

भाऊ वाचे पोथी
येऊं दे रे कानांवर
नको भूकू रे कुतऱ्या
तुले काय आलं जरं !

✤ ✤ ✤

कधीं बाप जल्मामधीं
घडूं नहीं ते घडलं
जसं कंगल्याचं लेंकरू
बंगल्यावरती चढलं !

✤ ✤ ✤

गेला वांकडा तिकडा
दूर सगर दिसला
जसा शेताच्या मधून
साप सर्पटत गेला !

✤ ✤ ✤

कडू बोलतां बोलतां
पुढें कशी नरमली
कडू निंबोयी शेंवटी
पिकीसनी गोड झाली !

✤ ✤ ✤

'फाट आतां टराटर,
नहीं दया तुफानाले
हाले बाभयीचं पान
बोले केयीच्या पानाले !

✤ ✤ ✤

उच्च्या खुज्या जोडप्याची
कशी जमली रे जोड
उगे ताडाखाले जसं
भुईरिंगनीचं झाड !

✤ ✤ ✤

हिरवे हिरवे पानं
लाल फय जशी चोंच
आलं वडाच्या झाडाले
जसं पीक पोपटाचं !

✤ ✤ ✤

पयसाचे लाल फुलं
हिर्वे पानं गेले झडी
इसरले लाल चोंची
मिठ्ठू गेले कुठें उडी ?

✤ ✤ ✤

सोमवती आमावस
कशी आंधारली रात
देल्ही रातांध्याच्या हाती
पेटयेल काडवात !

✤ ✤ ✤

कशी दाखईन रस्ता
आली आंधाऱ्याची रात
कसा देईन रे दान
सांग बुझाऱ्याचा हात ?

* * *

तुझी म्हईस ठांगय
नको रूसू लतखोऱ्या
माझी म्हईस दुभती
नको हुसूं रे शेजाऱ्या !

* * *

हिच्या तोंडांत साकर
आन पोटांत निंबोनी
मोठी आली पट्टवनी
साऱ्या मुल्खाची लभानी !

* * *

अरे आरद्टाकेला
तुले कशाचं हिरीत
तशी निझूर शेताले
काय सांगे बरसात ?

* * *

नागरलं शेत
खूप केली मशागत
पेरल्या मुकऱ्या
मारे गानं गात गात !

* * *

फाटी गेलं पांघरून
नको बोचकूं रे चिंध्या
झालं गेलं पार पडी
नको काढूं आतां गिंध्या !

\+ + +

तुले परनलं पोरी
झाल्या जल्माच्याज भेटी
दिल्लीचं बिल्‌बांद्‌र
आनी देलं तुझ्यासाठीं !

\+ + +

घरांमधी सर्वे गोरे
तूंच कशी कायीघूस
उज्या जवारींत आलं
जसं कान्हीचं कनूस !

\+ + +

माझं उघडे नशीब
पीकं शेतांत दाटलें
तुझे जबून शेजाऱ्या
कसे डोये रे फुटले ?

\+ + +

रुशी बसे वर माय
तिचा रुसवा रे केवढा ?
" म्हने पापड वाढला
कसा वांकडा तिकडा ? "

\+ + +

हाया समोरची शाया
पोरं शायेतून आले
हुंदडत हायाकडे
ढोरं पान्यावर गेले

\+ + +

पिको आराटी बोराटी
नको शेतामधी बांद
बरी बिरान्याची मया
होऊं नहीं भाऊबंद

\+ + +

शेतकऱ्या तुझे हाडं
शेतामधीं रे मुडले
मुडीसनी झाली राख
तापीमाईत पडले

\+ + +

माझी कपीला तान्हेली
कशी पान्यावर गेली
तिले गाऱ्यानें गियली
आन् पान्यानेज पेल्ही

\+ + +

रस्त्यानं चालली
मायबहीन आपली
मांघे फीरी पाह्यं
पाप्या, धरत्री कापली

\+ + +

१२५८५
३१।३।५३

घाम गायतां शेतांत
शेतकरी तरसला
तव्हां कुठें आभायांत
मेघूराया बरसला !

* * *

मेहेरूनचा तलाव
नहीं लहान सहान
आज त्यानं भागवली
जयगांवाची तहान

* * *

अरे, वाहत वाहत
आली नदी ' मेहेरूनी '
तिले म्हनूं नका लेंडी
भागवते धोनं पानी !

* * *

वटवट्या नारी
तुले वटवयाची सव
तुले देल्हा जल्म
कोन नितातेल देव ?

* * *

वाटेचं वावर
काटीकुपाटीनं बंद
निस्सवली नार
काय करती भाऊबंद ?

* * *

सावकारा, तुझं मन
मन मोहरी एवढं
तुझं राकेसाचं डाच
तुझं पोट केव्हढं ?
देवा, घेनं जलमनं
खुटेनाज तुझ्या दारीं
तसं देनं न मरनं
सुटेनाज सवसारीं
अरे पांडुरंगा, तुझी
कशी भक्ती करूं सांग ?
तुझ्या रूपापुढे येतं
आड सावकाराचं सोंग

* * *

डोये लागले आभायीं
मेघा नको रे बरसूं,
केली नजर खालती
माझे शीपडले आंसू

* * *

भरली येहेर
मोट चाले भराभर
कशाले करतं
कनाचाक कुरकुरं

* * *

वसांडली मोट
करे धो धो थायन्यांत
हुंदडत पानी
जसं तान्हं पायन्यांत !

★

# कांहीं व्यक्तिचित्रें

[१]

खटल्याच्या घरामधीं
देखा माझी सग्गी सासू
सदा पोटामधीं मया
तसे डोयामधीं आंसू

हिच्या अंगामधीं देव
सभावानं देवगाय
माले सासरीं मियाली
जशी जलमदाती माय !

[२]

माझी ननद ' कासाई '
हिचा लोभ सर्व्यावरी
रूप देवानं घडलं
जशी इंदराची परी

हिचं सरील नाजुक
चंबेलीच्या फुलावानी
देली सम्रीताच्या घरीं
सोभे राजाचीज रानी !

[ ३ ]

माझी जेठानी ' पानाई '
कशी मनांतली गोट
हिरीतांत शिरीहारी
तोंडामधीं हरीपाठ
बोले तोंड भरीसनी
तसं हातभरी देनं
काम आंग मोडीसनी
सैपाकांत सुगडीन
भरतार देवध्यानीं
मनीं दुजाभाव नहीं
जसे वाड्यांत सोभती
पांडुरंग रूखमाई !

[ ४ ]

माझी वाहारी ' सीताई '
हिचं मोठं मन देखा
देल्हा देवानं सभाव
खडीसाखरसारखा
तस रूपबी घडलं
जशी बोरांतली आयी
आन कामामंधी बाकी
त्याले कुठे तोड नहीं

असो सासरीं माहेरीं
जशी आंब्याची सावली
झिजे आवघ्याच्यासाठीं
अशी लाखांत माऊली !

[ ५ ]

माझी सासू ' भिवराई '
कसं गंमतीचं बोलनं !
हाशीसन आवघ्याचं
पोट गेलं फुटीसन
नांव ठेये आवघ्याले
करे सव्र्यांची नक्कल
हांसवता हांसवता
शिकवते रे अक्कल !

[ ६ ]

पाहीसनी उंदराले
आंगामधी भरे हींव
चिमाबोय चिंव चिंव
आला बोकया गेला जीव !
देखीसनी बेंडकोयी
कशी झाली धांवाधांव
आतां डरांव डरांव
आला साप गेला जीव !

[ ७ ]

देखा देखा 'ठमाबाई'
मोठी बोल्याले आगीन
डोये भोकराच्यावानी
जशी पाहाते वाघीन
कव्हां हाशीखुशीमधीं
आयाबायांत रमते
येतां डोक्यामधीं राग
जशी चुढेल घुमते

[ ८ ]

'भीमा' साजरी वाहारी
हिनं उजयलं घर
अरे वाड्यामंधी वागे
आवघ्यांशीं आदबूशीर
आला मिर्गाचा पाऊस
पडे आंगावऱ्हे ईज
पडे धर्तीवर भीमा
लागे शेवटली नीज

[ ९ ]

'मांगो' बोवाजी तुमचा
लोभ पोरांसोरांवरी
घेता कव्हांबी उचली
पटकन कढ्यावरी

खांद्यावर आडी काठी
दोन्ही हात काठीवर
वाड्यांतून जाती येती
जसे घालत पाखर

[ १० ]

' गनपत ' ' गनपत '
गांवामधी मोतीदाना
याची जबान मोलाची
इमानाले इसरेना
खऱ्यासाठीं झगड्याले
याची मोठी रे हिंमत
गनपत गनपत
सर्व्या गांवामधीं पत
आवध्यालेज लह्यना
नही कोन्हाले पारखा
सग्यासायासाठीं झिजे
झिजे चंदनासारखा.

[ ११ ]

' भानादाजी ' ' भानादाजी '
घरामंधी लिखनार
कर्तेसवरते मोठे
यांच्या हातीं कारभार
अरे हातीं कारभार
गोड सम्धाशीं बोलनं

डोईवरती पगडी
वानीब्राह्मनी चालनं
घरामधीं दबदबा
तसं वागनं तोलाचं
सर्वे लोक देती मान
कसं बोलनं मोलाचं
भाईरूनी येतां घरीं
तांब्याभरी पानी पेल्हे
माझी 'काशी' व्हती तान्ही
तीले घीसनी बसले

तिले ठेवलं रे खाले
छातीमधीं कय आली
अरे कोन्ह्या दुस्मानानं
मूठ दाजीले मारली !

[ १२ ]

अरे 'मारोत्या' 'मारोत्या'
तुझं मराठं घरानं
असा कसा झाला तरी
बाटीसनी मुसनमान
पोरासोरांमधी नाचे
काठी फिरये गर्गर
फेके दगडाचा गोया
फोडे कौल डोक्यावर

आला घरदार सोडी
तुले कशाची फिकीर

तुझ्या कर्मामधीं भीक
झाला दारचा फकीर

आज मोठी एकादशी
नको करूं दारीं गिल्ला !

जाय तुझ्या तक्क्यामधीं
तठी म्हन बिसमिल्ला !

[ १३ ]

सदा अंगावर बुरा
डोकं कुंभाराचा आवा

नहीं डोक्यांत अक्कल
पन बुचुबुचु जुवा

नहीं कामांत उरक
खुळबुळते चेंगट

करे आदयआपट
आलं अंगांत खेंगटं

कधी कोनाचं ऐकेना
अशी आस्तुरी हाटेल

नहीं कोणाची जरब
भरतार गद्याटेल

नहीं लुगड्याले पानी
वर्स गेले निंघसिन
जशी घरामंधी नांदे
'कुसुंब्याची' घसोटीन
कोन्ही बोल्याच्याच आंधीं
करे बोंबलाबोंबल
हिले जल्म देतां देवा
काय हाताले झुंबलं !

[१४]

'घुडाबोय' 'घुडाबोय'
घुडाबोय रे केवढी
म्हनूं नका रे केवढी
भूई-रिंगनी एवढी !
एका हातांत काडुक
दुज्या हातांत भाकर
डोक्यामधीं नाकतोडे
हिच्या पायाले चक्कर
हिच्या पायाले चक्कर
तोंडामधीं किरकिर
दोन्ही डोयाले झांजर
नाकामधीं तपकीर
खिजवती सम्देझनं
'घुडाबोय' कोनी 'घुडी'

हिच्या आवतीभंवती
पोराटोराच्या झुंबडी

हिले पाहीसन देवा
जीव पडे भरमांत

कसा 'घुडीले, घडतां
तुझा आंखडला हात !

[ १५ ]

आला 'मुनीर, टेसांत
कमेटींतला शिपायी

डोये वट्टारत पाहे
रस्त्यामधली सफाई

आला मुनीर शिपायी
याची खुरटेल दाढी

याच्या हातामधी छडी
आन तोंडामधीं बिडी

याची नजर चेकानी
दोन्हीं बुबुयं कुखडे ?

एक 'आव्हान्याच्याकडे'
एक 'कान्हाकाई'कडे !

आला मुनीर शिपायी
याची पाहीसन छडी

पोरं गडरीवरले
घरामधीं गेले दडी
अशी मुनीर दादाची
सर्व्यांवर दहसत

हातीं घेतला झाडना
भंगी पये घाबरत
खेकसनं दमदाटी
याचं काम जातां सरी
मंग मारतो बैठक
'इठू' सोनाराच्या दारीं

[१६]

आली मुक्की पिंजारीन
आली कापूस पिंज्याले
हातामधीं धुनुकनी
तोंडीं वटवट चाले
हिले येयेना बोलतां
काय मुक्याचं बोलनं ?
समजनं समर्जी घ्या
जसं तातीचं वाजनं !

[१७]

चाले गान गात गात
'भोजा' फुटका फुटका
जातां येतां वाड्यांतून
सदा करतो वटका

मोठं बोलनं गंमती
सांगे गानं गाईसन
आवघ्याले हांसाळतो
याचं सुरूं सदा गानं !

[ १८ ]

'छोटू भय्या' 'छोटू भय्या'
तुझी कानटोपी लाल
दिसे चाकीवानी तोंड
तुझे थुलथुले गाल
तुझे डोये सदा लाल
त्याच्यांतून गये पानी
तुझ्या नाकाची ठेवन
भज्या-गुलगुल्याच्यावानी
पोट माथनीसारखं
व्हे बोंबीच झांकन
व्होट पोपटाची चोंच
पढे तुयशीरामायन

[ १९ ]

'लालू मिय्या' 'लालू मिय्या'
गांवामधी आवलिया
सदा अंगावर बुरा
पावसयांत आंघोया

दाढीमिशाचं जंगल
अंगीं फाटकी गोदडी

हातीं भली मोठी काठी
पाठी चिंध्याची गाठोडी

तूले नही घरदार
सोतामधींच मगन

बारीमास भटकतो
नही खानं नहीं पेनं !

★

# धरत्रीले दंडवत

काया काया शेतामंधी
घाम जिरव जिरव

तव्हां उगलं उगलं
कायामधून हिरवं !

येता पीकाले बहार
शेताशेतांत हिर्वय

कसं पिकलं रे सोनं
हिर्व्यामधून पिवयं !

अशी धरत्रीची माया
आरे, तीले नहीं सीमा

दुनियाचे सर्वे पोटं
तिच्यामंधीं झाले जमा

शेतामंधीं भाऊराया
आला पीकं गोंजारत

हात जोडीसन केला
धरत्रीले दंडवत

शेतामधीं भाऊराया
खाले वांकला वांकला

त्यानं आपल्या कपायीं
टिया माटीचा लावला
अशी भाग्यवंत माय
भाऊरायाची जमीन
वाडवडीलाचं देवा,
राखी ठेव रे वतन !

★

**आदीमाया** [ पृष्ठ. १ ]

येळी–वेडी ( विराट या अर्थी. ) लेनं.–लेणं, अलंकार. समदूर – समुद्र. टाया–टाळा, फांटा. नरोंडाच्या – नररुंडाच्या वटीं – ओटींत. कोम्हायतां – कुरवाळतां. गिऱ्हे–ग्रह. तुझ्यालेखीं – तुझ्यापुढें. गिऱ्यान – ग्रहण.

**माहेर** [ पृष्ठ ३ ]

हायलींत – हवेलींत. आम्हाइले – आम्हांला. सोता – स्वतां. ' घमा ' – घनश्याम. गना – गणपत. धना – धनाजी ( हे तिघे भाऊ. ) पैकीं श्री. धनाजी महाजन, पेन्शनर हेडमास्तर हे हयात आहेत. जळगांव येथें राहतात. गेल्या चाळीस वर्षांपासून समाज-सेवा करीत आहेत. त्यांची मुलें कर्तीसवरती व सुशिक्षित आहेत. सर्वांत लहान मुलगा बी. एस्. सीच्या वर्गांत आहे. धुयांत – धुळयांत. आशील – कुलवंत. लौकी – नदीचें नांव. नित्तय – नित्तळ.

**कशाला काय म्हनूं नही** [ पृष्ठ ५ ]

येहेर – विहीर. मया – मळा. डोया – डोळा. हाय – हाळ, गुरांढोरांसाठीं केलेला पाण्याचा सांठा. सोताची – स्वतःची. भंवला – भोंवला.

**संसार** [ पृष्ठ ७ ]

तावा – तवा. मियते – मिळते. कयस – कळस. भिलावा –

बिबा. भीमफूल – बिब्याला चिकटलेलें गोड फळ. गोडंबी – बिब्यामधील गोड चारोळ्या. जोजार – यातनेचा संसार.

### घरोट [ पृष्ठ ९ ]

घरोट – दळण्याचें जातें. गोट – गोष्ट. मरोट – मळवट. तानं – हा शब्द चुकून पडला आहे. त्याऐवजीं 'नातं' म्हणजे नातें असा वाचावा. वानीबाम्हन – वैश्यब्राह्मण. माले – मला. भ्रल्या – भरल्या गये – गळे. पाऊ – तळया, जात्याचा वरचा वर्तुळाकार दगड. माकनी – जात्याच्या तोंडावर बसविलेले सच्छिद्र लांकूड. टकारीन – टकारीण, जाते टाकवणारी. टाकलाये – या चुकून पडलेल्या शब्दाऐवजीं 'टाकयाले' म्हणजे टाकवण्यासाठीं असें वाचावें.

### मन [ पृष्ठ १२ ]

वढाय – ओढाळ. वाहादन – वावटळ. ईज – वीज. खाकस – खसखस. यवगी – योगी. सपन – स्वप्न.

### हिरीताचं देनं घेनं [ पृष्ठ १४ ]

हिरीत – हृदय. तरसणें – तृषित होणें. चुल्हा – चूल. थाटी-वाटी – ताटवाटी. राखोयी – राखोळी. कुपाटी – कुंपण कनगा – कणगा. डाडोर – पोट ( व्यंगार्थी ) ढेरी. देही – देह

### लपे करमाची रेखा [ पृष्ठ १५ ]

रेखा – रेषा. गिऱ्हे – ग्रह. लाल – मुलगे. पंचांगन – पंचांग. कये – कळे, कळते.

**वाटच्या वाटसरा** [ पृष्ठ १६ ]

आढवानी – अनवाणी. ढयला – ढळला. गोट – गोष्ट. लावनी – लावावी लागेल. वाह्यदन – वावटळ.

**शेतीची साधनें** [ पृष्ठ १८ ]

या ओवींत प्रत्येक शेतीच्या साधनांचीं वैशिष्ट्यें दिलीं आहेत. ( सरतं, मोघडा, पांभर, कोळपं, वखर, नांगर वगैरे शेतीचीं औजारें ) धारये – धारवणें म्हणजे बीं पेरल्यावर झाडाच्या डहाळीनें त्यावर माती लोटणें. निंदाई – तण काढणें.

**आला पाऊस** [ पृष्ठ १९ ]

परमय – परिमल. खारी – धाब्यावर टाकण्याची पिवळी चिक्कण माती. चिह्लाया – आरोळ्या. हारास – लिलांव.

**पेरनी** [ पृष्ठ २१ ]

पांभर मोघडा – शेतीचीं साधनें. मिरूग – मृग. ढोरंढाकं – गुरंढोरं.

**देव अजब गारोडी** [ पृष्ठ २३ ]

पर्गटले – प्रगटले. कारोन्या – करुणा.

**कापणी** [ पृष्ठ २४ ]

तढे – तडे भेगा. इय्ये – विळे.

**रगडणी** [ पृष्ठ २६ ]

खयं – खळें ( धान्य तयार करावयाची जागा. ) मेढे – ज्या खांबाभोंवती बैलांची पात फिरते तो रोवलेला खांब. पात – बैलांची दावण.

**उपननी** [ पृष्ठ नं. २८ ]

उपननी – वाऱ्याच्या सहाय्यांन धान्यांतील भुसा उडवून धान्य तयार करणें. ( ज्ञानेश्वरींत हा शब्द वापरलेला आहे. ) पाट्या – टोपल्या. तिव्हार – तीन पायांची उंच तिवई. खयाकडे – खळ्याकडे. हारखलं – हर्षले. झन्नाट्या – खूप जोराचा. मदनाच्या – बैलाच्या खुराखालीं जो कणसांचा चुरा झालेला असतो त्याला मदन म्हणतात. पोखरी – गवताचा झाडू. त्या झाडूनें धान्याच्या राशीवरील बोंडें काढून घेतात. कारोनी -- करुणा.

**मोट हाकलतो** [ पृष्ठ ३० ]

येहेर – विहीर. आडोय – आडोळ, विहिरीच्या दोन्हीं भिंतीवरील दोन मोठीं लांकडें, त्याला कणा व चाक लावलेलीं असतात. नाडा समदूर – मोटीला लावलले दोन दोर.

**गाडी जोडी** [ पृष्ठ ३१ ]

चनूका – चुणूक. सरील – शरीर. गुंढयगाडी – देवळाच्या आकाराची गाडी, या गाडींतून लग्नसमारंभांत नवरानवरी व वरमाय यांना आणण्याची प्रथा आहे. मसून्याची–मश्रूची. वऱ्हे – वर. तिवस – एक प्रकारचे लांकूड, गाडीच्या दंड्यांना हें लांकूड वापरतात. हुर्पाटले – पळविले. धुर्करी – गाडी हाकणारा. पुऱ्हाणंआरी – पराणी, आरी असलेली भरीव बांबूची काठी.

**गुढी उभारनी** [ पृष्ठ ३३ ]

येरांयेरांवरी – एकमेकांवर. निस्सयेलावानी – आळशासारखे. पोथारा – पोतेरे लावा.

**आखजी** [ पृष्ठ ३५ ]

आखजी – अक्षय्यतृतीया, हा शेतकऱ्यांचा मोठा सण. विशेषतः स्त्रियांचाच हा सण आहे. त्या दिवशीं मुलीबाळी गौरी मांडून निरनिराळे खेळ खेळतात. हिंदोळ्यावर बसून गाणीं गातात. शेतकऱ्यांचें नवे वर्ष येथून सुरू होते. सालदार महिनदारांचे पगार याच दिवशीं ठरवितात.

खेयतो – खेळतो. पलट – फिरून. डांग – डहाळी. खेय – खेळ.

**पोया** ( पोळा ) [ पृष्ठ ३८ ]

आंघोयी – आंघोळी. निवद – नैवेद्य. कहीनाथे – कधींकाळीं. मगदूल – मस्त. यायभरी – दिवसभर. हेंडाळूं – पळवूं. हेंडाळणें – पळविणें. गेठा – कवड्यांचा गुंफलेला हार. शेंव्या ऐवजीं शेंब्या, वाचावे.

**गोसाई** [ पृष्ठ ४१ ]

पेटयी – पेटवून. घीसन – घेवून. यवगी – योगी. पयी – पळून. आठून – येथून. वढाय – ओढाळ. उखरूं – उकरूं. पयीसनी – पळून. जेऱ्ही – जहरी.

**जयराम बुवाचा मान** [ पृष्ठ ४४ ]

[ जळगांव लगतच आसोदा रस्त्यावर 'जयराम बुवाचें' स्थान आहे. मुंजा मुलांना दीर्घायुष्य लाभावें म्हणून शेतकरी लोक नवस फेडायला येतात. आपल्या आप्तेष्टांना रोडग्याचें जेवण देतात. त्या जयराम बुवाची कथा खालील कवितेंत आहे. ]

मानदेणें – नवस फेडणें. लोडगे – रोडगे. आवगत – हकीकत. मुंजा – लहान मुलगा. टीस – तहान. शिकायी –

शिंकाळी. वडांग – कुंपण. कुदीसनी – ओलांडून. नित्तय – नित्तळ, स्वच्छ. पान लागणें – सांप डसणें. बातनी – बातमी. तठे – तेथें. "हिराबाबू" – या नांवाचा मांत्रिक. तो ज्या शेतांत मरून पडला त्या शेताला 'हिराबाबू' असें अजूनही म्हणतात. बिढे – शेताचें नांव, तेथें आतां खळीं आहेत.

## खोक्री माय [ पृष्ठ ४९ ]

एकदां गांवामधें खोकल्याची जोराची सांथ आली, गांवांतील खोकला हाटता हाटेना. तो खोकला कसा नाहींसा झाला ती कथा. अजूनही मेहेरुणच्या रस्त्यावर त्या खोक्रीमायचें प्रतीक आहे.

सात – सांथ. मेहरूण – जळगांव नजीकचें खेडें, तेथील तलाव प्रसिद्ध आहे. सपा – नाहींशी. खल्लीसनी – खरडून. धरती – धरिती, धरितात. वयव – वळव.

## कायघडे आवगत [ पृष्ठ ५२ ]

भवया – 'भवळा, मळ्याचें नांव. हालकलं – हलकं झालं. बारे धरणें – वाफ्यांना पाणी घालणें. आरायी – आरोळी. कायजांत – काळिजांत. आन – आण, शपथ. पोवा – पांवा, बांसरी. ढोरकी – गुराखी. वजे वजे – हळूं हळूं. तानका – तन्हुला. व्हयीसनी – होऊन. खेयला – खेळला.

## आप्पा महाराज [ पृष्ठ ५५ ]

श्रीगुरु आप्पा महाराज नांवाचे एक संत पुरुष होऊन गेले. बाळपणापासूनच त्यांच्या हृदयांत भक्तीचें बीज होते. जळगांवांतील राममंदीर देवस्थानचे ते अधिपति होते. त्यांनी

कार्तिकी एकादशीचा उत्सव सुरू केला. दहा दिवस दहा अवतार वहनावर बसून येतात. त्यानंतर अकराव्या दिवशीं कार्तिकीला रथोत्सव भरत असतो. श्रीआप्पा महाराज हे श्रीसद्गुरु नृसिंह सरस्वति स्वामी शिष्य होते. रामसेवा करतां करतां ते १९१० सालीं वैकुंठवासी झाले. त्या प्रसंगावर या ओव्या आहेत. सध्यां ह्यांचे नातू ह. भ. प. केशवमहाराज हे गादीवर आहेत.

गयाले – गळाले. कयस – कळस. वहन – वाहन. सवारला – शृंगारला. नारय – नारळ. मया – मळा. मोगरी–रथाचीं चाकें अडविण्यासाठीं व वळविण्यासाठीं केलेली लांकडी वस्तु. चोपणीसारखी ती असते. कानगी–रथाला दिलेली दक्षिणा, वर्गणी. जयगांव – जळगांव.

**आली पंढरीची दिंडी** [ पृष्ठ ५८ ]

[ आषाढी एकादशीला श्री आप्पामहाराज यांची दिंडी पंढरपूरला जात असे. ती अखंड परंपराच आहे. महाराज पंढरीहून दिंडीसह आले म्हणजे गांवांतील भाविकजन भेटीला जात, दर्शन घेत. जे पंढरीला गेले नसतील त्यांना पंढरीची वारी घडल्याचें पुण्य मिळालेंच पाहिजे अशी त्यांची भावना होती व अजूनही आहे.]

भोये – भोळे. पयाले – पळाले. टायमुर्दुंग – टाळमृदंग. गिंडी – तेलीटोपली. वारी. करी – वारी करून. जयगायीं – जळगांवीं. शिक्यावर – शिंक्यावर. तठी – तेथें ( पंढरपूरला ) दमन्या – धमण्या, मोठ्या गाड्या. सामायन – सामान.

**विठ्ठल मंदिर** [ पृष्ठ ६० ]

जुन्या जळगांवांत विठ्ठल मंदिर हेंही एक जुनें देवस्थान आहे. शेतकरी लोकांत भजन, कीर्तन, वारकरी संप्रदाय कैलासवासी ह. भ. प. झेंडूलाबुवा यांनीं सुरू केला हा एक महत्त्वाचा उल्लेख या कवितेंत आहे.

गह्यरीसन – गहिंवरून. टायकरी – टाळकरी. राकेस – राक्षस पावली – वारकऱ्यांचें भजन, नृत्य. गये – गळे.

**खरा देवामधीं देव** [ पृष्ठ ६२ ]

कानोड – देवी, एक दैवत, विशेषतः आसुरी लोक या दैवताची पूजा करतात, डफावर गाणीं गातात. कानोडचें चरित्र म्हणजे ती रुसते व पतीजवळ 'कन्हेराजवळ' निरनिराळे दागीने मागते एवढेंच ! तेव्हां हें दैवत सोडून तुम्हीं विठोबाची भक्ती करा, असें कवयित्रीचें सांगणें आहे.

फिटेनाज – फिटेचना. नितातिल – नित आततायी, हावरी. कानोडी – शरमिंधी. इने – विणतो. घरोट – जातें. बोरशा – या नांवाचा एक नामांकित आंबा पूर्वखान्देशांत प्रसिद्ध आहे. देवदेवतं – देवदैवत.

**मानूस** [ पृष्ठ ६४ ]

हाकाकेल – हपापलेली. नियत – निति. डाडोर – पोटाची ढेरी. कानूस – माणसाव्यतिरिक्त कांहींतरी !

**पिलोक** ( प्लेग ) [ पृष्ठ ६५ ]

खयामयांमधी – खळ्यामळ्यामध्यें. भाईर – बाहेर. करंटी – क्वारंटाईन.

**चुल्हा पेटतां पेटेना** [ पृष्ठ ६६ ]

धुक्रय – धूर. डोये – डोळे. नूरीपट्टवकरीन – नूरी या नांवाची पटवेकरीणबाई वाड्याशेजारीं राहात असे. ती घरांतून केव्हां पळून जाई त्याचा नेम नसे. तिची उपमा फुंकणीला दिली आहे. आक्काड्या – आगकाड्या. धुक्कयेला – धुराटलेल्या. इस्तो – इस्तव. तावा – तवा. मांघे – मागे. दुल्ली – भाकरी पोळ्या ठेवण्याची टोपली, दुरडी. लांसे – आंच लागे. खदखदां हांसे – फार वेळ तवा चुलीवर असला म्हणजे त्याच्या काजळीवर ठिणग्याचा समुदाय चमकत राहतो.

**स्फुट ओंव्या** [ पृष्ठ ६८ ]

जरं – दुखणं, रोग. कंगल्याचं – कंगाल माणसाचं. सगर – पायवाट. निंबोयी – निंबोणी. बाभयीचं – बाभळीचं. केयीचं – केळीचं. भुईरिंगनी – जमिनीवर पसरलेली रिंगणी. फय – फळ. पयस – पळसाचं झाड. उडी गेले – उडून गेले. मिठ्ठू – पोपट. रातांध्याच्या – रात आंधळ्याच्या. पेटयेल – पेटवलेली. काडवात – तेलाच्या चिंध्या गुंडालेली काडी. बुझारा – कंजूष. ठांगय – भाकड. लतखोऱ्या – वाईट सवंय असलेला. हुंसू – हुसणें – हेवा करणें. पट्टवनी – पटवून सांगणारी. लभानी – भामटी, बलुची, लमाणीबायांना लभानी म्हणतात.

आरद् टाकेल – कठोर, ज्याच्या मधे आर्द्रता नाहीं तो. हिरीत – हृदय. निझूर – नापीक. मुकन्या – निःसत्व बीं. मारे – अगदीं खूप. गिंध्या काढणें – मागच्या गोष्टी उकरून काढणें. परनलं – लग्न करून घरीं आणलं. कायीघूस – काळी-घूस. उज्या – पांढऱ्या. कान्हीचं – काळं, जबून – दुष्ट.

डोये – डोळे. हाय – गुरांसाठीं केलेला पाण्याचा सांठा. शायेंतून – शाळेंतून. आराटीबाराटी – कांटेरी झुडपें. बिरान्याची – परक्यांची. मया – मायाममता. मुडले – मोडले. तापीमाई – तापी नदी. गाऱ्यानें – चिखलानें. गियली – गिळली. गायतां – गाळतां. निस्सवली – ताळतंत्र सोडला. राकेसाचं – राक्षसाचं. जलमनं – जन्म घेणें. देनं – कर्ज. सुटेनाज – सुटेचना. सवसारी – संसारी. आड – आडवं. कनाचाक – मोटीची दोन चाकें. वसांडली – ओसंडली. थायन्यांत – थारोळ्यांत.

**कांही व्यक्तिचित्रें** [ पृष्ठ ७६ ]

[ १ ]

मया – माया ममता. मियाली – मिळाली.

[ २ ]

इंदराची परी – इंद्राची परी. सरील – शरीर. चंबेली – चमेली. सम्रीताच्या – श्रीमंताच्या.

[ ३ ]

कै. वा. पानाई यांच्याबरोबर कवयित्री कथाकिर्तनाला जात असे.

जेठानी – जेठाणी, मोठी जाऊ. गोट – गोष्ट. हिरितांत – हृदयांत. सुगडीन – सुगरण, स्वयंपाकांत प्रवीण.

[ ४ ]

कै. वा. सीताई ( सीताबाई ) यांचे दोन पुत्र श्री. पितांबर

चौधरी व भगवान चौधरी हे कार्यकर्ते आहेत. पानाबाई त्यांच्या आजी होत.

वाहारी – सूनबाई. सभाव – स्वभाव. आयी – आळी.

[ ५ ]

भिवराई – कवयित्रीची चुलतसासू, यांचे नातू श्री. काशीनाथ पाटील हे सध्यां पाटीलकीच्या हुद्यावर आहेत. श्री. रामदास रावजी पाटील हे ज्येष्ठ नातू आहेत.

हाशीसन – हांसून हांसून.

[ ७ ]

आगीन – आग. डोये – डोळे. चुढेल – पिशाचिनी.

[ ८ ]

भीमाई – या अगदीं तरुणपणीं अंगावरून वीज पडून मरण पावल्या. श्री. रघुनाथ चौधरी यांच्या धर्मपत्नी.

साजरी – सुंदर. उजयलं – उजळलं. ईज – वीज.

[ ९ ]

उचली – उचलून. कव्यावरी – कडेवर. आडी – आडवी.

[ १० ]

गनपत – कै. गणपत खडके, ( दत्तक श्री. राजाराम खडके एम्. ए. यांचे वडील. ) झगड्याले – झगडण्यासाठीं. लद्मना – धारजिणा, सग्यासायासाठीं – सगेसोयरे यांच्यासाठीं.

[ ११ ]

भानादाजी – कवयित्रीचे सर्वांत मोठे दीर ( कै. भानाजी चौधरी. ) वानीबाम्हनी – ब्राह्मण वैश्याप्रमाणें. पेल्हे – प्यायले. 'काशी' – कवयित्रीची एकुलती एक मुलगी ( सौ. काशीबाई खडके ). घीसनी – घेऊन. कय – कळ.

[ १२ ]

बाटीसनी – बाटून. गोया – गोळा. सोडी – सोडून. जाय – जा. तक्या – मुसलमान लोकांची बैठक.

[ १३ ]

बुरा – घाण, मळ. जुवा – उवा. आदयआपट – आदळ आपट. खेंगटं – भूत. हाटेल – हट्टी. जरब – दाब, वचक. गह्याटेल – ढिलपट, मेंग्या. घसोटीन – घिसोटीण, कुसुंबे नांवाच्या खेड्यांत या लोकांची वस्ती आहे या बाया म्हणजे घाणेरडेपणाचा एक नमुना आहे. त्या दारोदार भीक मागतात.

[ १४ ]

धुडाबोय – अत्यंत खुजी अशी एक म्हातारी. बोय म्हणजे आजी. काडुक – काडी, काठी. नाकतोडे – टोळ. डोयाले झांजर – डोळ्याला आलेल्या झांपड्या. भरमांत – भ्रमांत.

[ १५ ]

टेसांत – ऐटींत. कमेटींतला – म्युनिसीपालिटींतला. चेकानी – तिरळी. बुबुयं – बुबुळें. कुखडे – कुणीकडे. आव्हान्याच्याकडे – आव्हाणे आणि कान्हाकाई नांवाचीं शेतें परस्पर विरुद्ध

[library stamp]

बाजूला आहेत. गडरीवरले – गटारीवरचे. दडी गेले – लपून राहिले. झाडना – झाडू. पये – पळे.

[ १६ ]

जुन्या गांवांत एक मुकी पिंजारीण होती, तातीच्या आवाजासारखा तिचा आवाज होता. आपली वटवट दुसऱ्याला समजलीच पाहिजे असा तिचा आग्रह होता. ती फार चिडकी होती.

पिंज्याले – पिंजण्यासाठीं. धुनुकनी – धनुकली. येयेना – येईना.

[ १७ ]

फुटका – डोळ्यानं आधू. वटका – वटवट. हासाळतो – हंसवितो.

[ १८ ]

चाकीवानी – गोल भोंपळ्याप्रमाणें. थुलथुले – थलथलीत. डोये – डोळे. गये – गळे. माथनी – माठ. बोंबीचं – बेंबीचं.

[ १९ ]

लाल्लामिय्या – लालखूमिय्या नांवाचा एक आवलिया होता. जळगांव येथें त्याचा उरूस भरत असतो. तो निरिच्छ होता. पावसायांत – पावसाळ्यांत. सोतामधींच – स्वतःमधेंच. मगन – मग्न. बारीमास – बारामहिने.

## धरत्रीले दंडवत

काया काया – काळ्या काळ्या, कायामधून – काळ्या रंगामधून, हिर्वय – हिरवळ, कपायीं – कपाळीं, टिया – टिळा.

REFBK-0007842
REFBK-0007842